www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २८ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, रविवार, ०२ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### सागरी किनारा प्रकल्पातील बोगद्यांमधील गळती रोखण्याचे काम सुरूच

● मुंबई, विशाल पाटील :

महानगरपालिकेने मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील गळती लागलेल्या भूमिगत बोगद्याची दुरुस्ती हाती घेतली असून दुरुस्तीचे काम लवकरच पूर्ण करण्यात येणार आहे. आतापर्यंत दोन सांध्यांमधून झिरपणारे पाणी रोखण्यात आले आहे. तसेच, तीन सांध्यांच्या ठिकाणी असणारा ओलावाही आटोक्यात आला आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी शुक्रवारी घटनास्थळी पाहणी करून दुरुस्तीकामांचा आढावा घेतला.

महानगरपालिकेच्या महत्त्वाकांक्षी सागरी किनारा रस्ता प्रकल्पातील भूमिगत बोगद्यामध्ये नुकतीच गळती लागल्याची घटना घडली होती. हजारो कोटी रुपये खर्च करून साकारण्यात आलेल्या प्रकल्पातील या घटनेमुळे पालिकेवर टीका झाली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी पाहणी करून तात्काळ दुरुस्तीचे आदेश पालिका अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार, पालिकेने गळती रोखण्याचे काम हाती घेतले. गळती रोखण्यासाठी पॉलिमर ग्राऊटिंगच्या इंजेक्शनच्या वापर करण्यात आला असून गळती रोखण्यात पालिकेला यश आले आहे.

पान २ वर

# लोकसभा निकालाआधीच जरांगे पाटलांचं मराठा समाजाला मोठं आवाहन !

● मुंबई, यश सावंत :



देशभरातील लोकसभा निवडणुका संपल्या असून सर्वांना आता 4 जूनचे वेध लागले आहेत. राज्यात यावेळची लोकसभा निवडणूक अनेक अर्थाने वेगळी ठरली. राज्यात मोठी राजकीय उलथापालथ गेल्या काही वर्षांत पाहायला मिळाली. तसेच यावेळी मराठा आरक्षण आंदोलनही राज्यभर पसरले होते. दरम्यान, निवडणुकीआधी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाआधी जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आवाहन केलं आहे.

जरांगे पाटील म्हणाले, की आम्ही सरकारसोबत चर्चेची दारं बंद केलेली नसून सरकारनं ठरवावं चर्चा करायची आणि मार्ग काढायचा. मात्र, हे उपोषण थांबणार नाही, असं मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी म्हंटलं आहे. ते अंतरवाली सराटीत पत्रकारांशी बोलत होते. निवडणुकीच्या निकालाचा गुलाल आमचा नसून एकाही मराठ्यानं यात सहभागी होऊ नये. कुणी पडलं तरी आणि कुणी निवडून आलं तरी त्यांना बोलू नका, असं जरांगे पाटील यांनी म्हंटलं आडे. त्याचबरोबर आम्हाला राजकारणात यायचं नाही. मात्र, सरकारनं सगेसोयरे शब्दाची अमंलबजावणी केली नाही तर सर्व समाजाच्या लोकांना घेवून 288 जागेवर उमेदवार उभे करणार असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

पान २ वर

## माणिकपूर पोलिसांच्या दडपशाहीविरोधात सामाजिक आणि राजकीय संघटनांचे ५ तास धरणे आंदोलन

● वसई, भावना जैन :



माणिकपूर पोलिसांच्या दडपशाहीविरोधात विविध सामाजिक आणि राजकीय संघटनांनी पोलीस उपायुक्तांच्या कार्यालयाबाहेर शनिवारी ५ तास धरणे आंदोलन केले. खोटे गुन्हे मागे घेऊन मारहाण करणाऱ्या पोलिसावर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून माणिकपूर पोलीस वादात सापडले आहे. २० रुपयांच्या वादातून तक्रार करण्यासाठी माणिकपूर पोलीस ठाण्यात गेलेला चावी बनविणारा मोहम्मद अन्सारी याला पोलीस उपनिरीक्षक राजशेखर सलगरे यांनी बेदम मारहाण केली होती. दुसऱ्या घटनेत वसईतील सामाजिक कार्यकर्ते ॲड आदेश बनसोडे यांच्यावर युट्यूबवरील विश्लेषक ध्रुव राठी याची एक चित्रफीत व्हॉटसॲप समूहात शेअर केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता. या दोन्ही घटना पोलिसांचा मनमानीपणा आणि हुकूमशाहीपणा दाखविणाऱ्या असल्याने वसईत संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या.

पान २ वर

## उद्योगांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी समिती; ६ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश



● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी उद्योजकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा सरकार अभ्यास करणार असून त्यासाठी सरकारने उद्योग विभागाच्या विकास आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ६ अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली आहे. ही समिती अभ्यासानंतर येत्या १० जून रोजी मुख्य सचिवांना आपला अहवाल सादर करणार आहे.

या समितीमध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता विभागाचे सचिव, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे येथील जमाबंदी आयुक्त आणि संचालक, मुंबईतील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव तसेच नगररचना आणि मुल्य निर्धारण विभागाचे संचालक या पाच जणांचा समावेश आहे.

पान २ वर

# "इंडिया आघाडीचे सरकार येणार आणि राहुल गांधी पंतप्रधान होणार," विजय वडेट्टीवार यांना विश्वास

● नागपूर, नितीन देवळेकर :



लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यावर इंडिया आघाडीचाच पंतप्रधान होईल, ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. चार जूननंतर भाजप सत्तेतून बाहेर गेलेला दिसेल आणि इंडिया आघाडीचे सरकार येईल, विश्वास विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. विजय वडेट्टीवार नागपुरात बोलत होते. इंडिया आघाडीची मोठ बांधून आम्ही लढलो. आमच्या विरोधात अपप्रचार केला गेला. मात्र आम्ही लढलो आणि हे दाखवून दिले. आम्ही खोटारड्या सरकारच्या विरोधात लढलो, असे वडेट्टीवार म्हणाले. इंडिया आघाडीत जी काही चर्चा होईल, त्या चर्चेमध्ये जे नाव पुढे येईल तो इंडिया आघाडीचा पंतप्रधान पदाचा उमेदवार असेल, मात्र राहुल गांधी यांच्या नावावर एकमत होईल, असा विश्वास आहे. काँग्रेसच्या नेत्यांनी मदत केली असल्याचे निलेश राणे म्हणत असतील, मात्र निकालानंतर कळेल कोणी कोणाला मदत केली आहे. महाराष्ट्रात भाजपचा सुपडासाफ होईल. यात रत्नागिरी आणि सिंधुदुर्गचाही समावेश आहे. राणे यांनी कितीही पैसे लावले असले तरी भाजप निवडून येणार नाही. भाजपच्या विरोधात लोकांनी मतदान केले आहे. त्यामुळे भाजप नेत्याच्या बोलण्यात तथ्य नसून महाराष्ट्रात भाजपपेक्षा पेक्षा जास्त जागा इंडिया आघाडी जिंकेल असेही वडेट्टीवार म्हणाले.

महादेव जानकर हे स्वतःच पराभूत होत आहे. कदाचित त्यांची वाट चुकली. ते जर आमच्या सोबत असते तर आज खासदार दिसले असते. दुर्दैवाने त्यांचा पाउल चुकले आहे, असे वडेट्टीवार यांनी सांगितले.सुनील तटकरे यांनाच विचारा पराभवानंतर ते कुठे जाणार आहे. आमचा तटकरेशी संबंध नाही, असेही वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले. मनोज जरांगे पाटील विधानसभा निवडणूक लढणार असेल तर स्वागत आहे. कोण किती जागा लढवाव्यात तो त्यांचा अधिकार आहे. जनता ठरवेल त्यांना कितपत साथ द्यायची. आताच्या राजकीय परिस्थितीमध्ये जे काही राजकीय पक्ष काम करत आहे तेच टिकतील. नवीन पक्ष काढून लढत असतील तर त्यांचे स्वागत आहे. आजच्या बैठकीत काँग्रेसचे सर्व वरिष्ठ नेते येणार आहेत. दुष्काळासंदर्भात या बैठकीत चर्चा होईल. दुष्काळाची भयावहता सरकारच्या लक्षात आणून द्यायचे आहे असेही वडेट्टीवार म्हणाले.

## उल्हासनगर महापालिका अधिकाऱ्यांत पदावरून खदखद, शासन प्रतिनियुक्त अधिकाऱ्यांची प्रतिक्षा



● मुंबई, विशाल पाटील :

महापालिकेत शासनाकडून प्रतिनियुक्तीवर अधिकाऱ्यांची नियुक्ती होत नसल्याने, वर्ग-१ व २ ची ८० टक्के पदे रिक्त आहेत. तर दुसरीकडे आवडी कर्मचाऱ्यांना एक पेक्षा जास्त महत्वाचे प्रभारी पदे तर नावाडी कर्मचाऱ्यांना साईडला टाकल्याचा सूर कर्मचाऱ्यांत असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात रंगले आहे.

उल्हासनगर महापालिका आयुक्तांनी मागणी करूनही, शासनाकडून प्रतिनियुक्तीवर अधिकारी दिले जात नसल्याने, वर्ग-१ व २ ची ८० टक्के पदे रिक्त आहेत. एक अतिरिक्त आयुक्त, दोन उपायुक्त, ६ सहायक आयुक्त, शहर अभियंता, बांधकाम व पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता, कर संकलक निर्धारक, वैधकीय अधिकारी, नगररचनाकार, परिवहन व्यवस्थापक, महापालिका सचिव, मुख्य अग्निशमन अधिकारी, जनसंपर्क अधिकारी आदी महत्वाचे पदे रिक्त आहेत. त्यामुळे महापालिका कारभारात सावळागोंधळ उडाला आहे. महत्वाचे बहुतांश पदे लिपिक दर्जाच्या कर्मचाऱ्यांकडे देण्यात आल्याने, त्या पदाचा दरारा महापालिकेत राहिला नसल्याचे चित्र आहे.

पान २ वर

# आता ससूनमध्ये नार्कोटिक केसेसमध्ये रक्तासह आरोपींच्या लघवीचेही नमुने घेतले जाणार

### चौकशी समितीची शिफारस



● पुणे, अभिजित येरल्लू :

नार्कोटिक म्हणजेच अमली पदार्थ सेवनाची शक्यता असलेल्या आरोपींनाही वैद्यकीय तपासणी करण्यासाठी ससून रुग्णालयातील आपत्कालीन कक्षात (कॅज्युअल्टी) आणले जाते. त्यावेळी त्यांची केवळ रक्ताची तपासणी केली जाते.


आता त्यांच्या लघवीचेही नमुने घ्यावेत, अशी शिफारस रक्ततपासणी प्रकरणात हेराफेरीची चौकशी केलेल्या समितीने केली आहे.

चौकशी समितीने अमली पदार्थ सेवनाची शक्यता असलेल्याच्या प्रकरणात आरोपीचे लघवीचे नमुने घेण्याची शिफारस केली आहे. परंतु, लघवीने नमुने प्रामुख्याने अमली पदार्थाचे सेवन केले आहे का नाही? याची खात्री करण्यासाठी घेतले जातात. आपल्याकडे अमली पदार्थांची तपासणी करण्याची सुविधा नाही. याबाबत विचार करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. -डॉ. चंद्रकांत म्हस्के, प्रभारी अधिष्ठाता, ससून रुग्णालय

ससून रुग्णालयात दोन डॉक्टरांनी अल्पवयीन आरोपीचा रक्ताचा नमुना बदलल्याचे प्रकरण नुकतेच घडले आहे. त्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाने मुंबईतील जे. जे. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे आणि इतर रुग्णालयाच्या दोन प्राध्यापक सदस्यांच्या त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती केली होती. या समितीने या प्रकरणाची चौकशी करून वैद्यकीय शिक्षण विभागाला अहवाल सादर केला. त्यामध्ये काही शिफारशी करण्यात आल्या असून, त्यांपैकी ही एक शिफारस करण्यात आली आहे. चौकशी समितीने म्हटले आहे की, अमली पदार्थ सेवनाची शक्यता असलेल्या प्रकरणातील आरोपींचे ससूनमध्ये रक्तनमुन्यांसह लघवी तपासणेदेखील अभिप्रेत आहे.

पान २ वर

## गंगोत्री मार्गात दरड कोसळली, नाशिकमधील भाविक थोडक्यात बचावले!



● नाशिक, सचिन कदम :

गंगोत्रीला गेलेल्या नाशिक मधील भाविकांच्या मार्गातच एक दुर्घटना घडली. गंगोत्री मार्गावर दरड कोसळल्याने अनेक गाड्या त्या खाली दबल्या गेल्या मात्र, नाशिकमधील याठिकाणी असलेले २६ भाविक सुरक्षीतरीत्या बाहेर पडले. आता हे सर्व जण उत्तर काशी येथे पोहोचले आहेत.

सध्या शाळा- महाविद्यालयांना सुटी असल्याने नागरीक मोठ्या प्रमाणात धार्मिक पर्यटनासाठी बाहेर पडले आहेत. नाशिक मधील २६ भाविकांचे एक पथक गंगोत्री आणि काशी येथे दर्शनासाठी २६ मेस नाशिकमधून बाहेर पडले होते. शुक्रवारी (दि.३१) गंगोत्री मार्गावर हर्षल येथे दरड कोसळल्याने गोंधळ उडाला. अनेक मोटारींवर दरडीचे दगड कोसळल्याने त्यांचा चक्काचूर झाला. मात्र, दरड कोसळण्याच्या घटनास्थळापासुन १५ किमी अंतरावर नाशिकचे भाविक होते. परंतु दुर्घटना घडल्यानंतर सुरक्षीत आहोत हे देखील त्यांना सांगता येते नव्हते कारण इंटरनेट सेवाच ठप्प झाली होती. त्यामुळे त्यांचे कुटूंबिय चिंतेत होते. मात्र लष्कराने दरड हटवल्यानंतर मार्ग मोकळा झाल्याची माहिती तान या पर्यटक संस्थेचे माजी अध्यक्ष दत्ता भालेराव यांनी सांगितले. हे सर्व भाविक आता उत्तर काशी येथे असून सर्वांचा प्रवास सुरळीत सुरू असल्याचे भालेराव यांनी सांगितले.

# सरकारी नोकरीमध्ये पदोन्नती मिळणे हा मूलभूत अधिकार नाही', सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



सरकारी नोकरदारांना पदोन्नती देण्यासंदर्भात राज्यघटनेत कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे नोकरदारांना पदोन्नती देण्याचे निकष, स्वरूप आणि त्यासाठी काय पात्रता असावी, हे ठरविण्यासाठी कायदेमंडळ आणि मंत्रिमंडळ स्वतंत्र आहे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. न्या. जेबी पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांचा समावेश असलेल्या सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सदर निकाल दिला आहे. भारतातील कोणताही सरकारी कर्मचारी पदोन्नती हा त्याचा अधिकार असल्याचे सांगू शकत नाही, कारण संविधानात पदोन्नतीबाबत कोणताही उल्लेख नाही.

खंडपीठाने पुढे म्हटले की, कायदेमंडळ किंवा मंत्रिमंडळ पदोन्नतीच्या जागा भरण्यासाठी निकष आणि त्यासंबंधीची प्रक्रिया ठरवू शकतात. नोकरीचे स्वरुप आणि उमेदवाराचे काम यावर पदोन्नतीच्या पदांवर रिक्त जागा भरण्यासाठीची नियमावली केली जाऊ शकते. तसेच पदोन्नतीसाठी स्वीकारलेले धोरण हे सक्षम उमेदवारासाठी योग्य आहे किंवा नाही, याचे पुनरावलोकन न्यायालय करू शकत नाही.

गुजरातमधील जिल्हा न्यायाधीशांचा निवडीवरून पदोन्नतीचा वाद सुरू झाला. हा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला असताना खंडपीठाने यावर टिप्पणी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे सरकारी विभागातील पदोन्नतीशी संबंधित अनेक विषयात स्पष्टता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक ठिकाणी पदोन्नतीच्या विषयावरून सरकारी कर्मचारी न्यायालयात जात असतात.

निकालाचे लिखाण करत असताना न्या. पारडीवाला यांनी म्हटले की, अनेक ठिकाणी वर्षानुवर्ष नोकरी करणारे कर्मचारी संस्थेप्रती असलेल्या आपल्या निष्ठेचे फळ मिळण्याची वाट बघत असतात. सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नतीच्या विषयात वेळोवेळी हेच सांगितले आहे की, पदोन्नतीसाठी सेवाज्येष्ठतेसह कामाचा दर्जाही पाहिला पाहीजे.

पान २ वर

## एअरपोर्टचा बनावट एन्ट्री पास बनवत घुसखोरीचा प्रयत्न; सहार पोलिसांकडून २२ वर्षीय तरुणाला अटक

● मुंबई, दिगंबर जाधव :



एअरपोर्टचा बनावट एन्ट्री पास तयार करून विमानतळावर घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या जितेंद्र दलाई (२२) नामक तरुणाला सहार पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

तक्रारदार दिनेशकुमार दिवेदी (५७) हे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल ( सीआयएसएफ ) मध्ये उपनिरीक्षक पदावर कार्यरत आहेत. सध्या त्यांची नेमणूक छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर असून एअरपोर्ट एन्ट्री पासची तपासणी करून वैध पास असलेल्या कर्मचाऱ्यांना विमानतळ परिसरात प्रवेश देण्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. त्यांच्या तक्रारीनुसार ३० मे रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास जितेंद्र विमानतळामध्ये प्रवेश करण्यासाठी स्टाफ गेट (वेस्ट) लेव्हल ३ या ठिकाणी आला. त्याने त्याच्याकडचा एअरपोर्ट एन्ट्री पास दाखवत विमानतळात प्रवेश कराचा प्रयत्न केला. मात्र दिवेदी यांना सदर पासबाबत शंका आल्याने त्यांनी तो बारकाईने तपासला. तेव्हा तो पास कलर फोटो कॉपी असल्याचे त्यांना आढळले. तसेच त्यावर कोणत्याही प्रकारचे सिक्युरिटी फीचर्स नव्हते. तेव्हा तो बनावट पास असल्याचे उघड झाले. द्विवेदी यांनी जितेंद्रकडे चौकशी केल्यावर त्याने सांगितले की एका कंपनीच्या सिगरेट शॉपमध्ये तो सेल्समन म्हणून काम करत होता.

पान २ वर

## संपादकीय

# चिंता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीची

विकासासोबत येणारे 'साइड इफेक्ट' आधी निसर्गाच्या आणि नंतर मानवाच्या मुळावर उठतात. अर्थात, त्यापूर्वी धोक्याची घंटा वाजलेली असतेच. आपली सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यात एका धनिकपुत्राने गाडीखाली दोघांना चिरडून ही घंटा पुन्हा वाजवली आहे. आपल्याला वेळीच ऐकू यायला हवी. संत, महात्म्यांच्या वास्तव्याने पावन झालेली, प्राचीन वैभवशाली पुण्यनगरी अर्थात पुणे शहर एकेकाळी आदिलशाहीने बेचिराख केले. गाढवाचा नांगर फिरवून पुणेकरांवर जरब बसविली. त्यानंतर राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवरायांनी सोन्याच्या फाळाने जमीन नांगरून पुण्याला भयमुक्त केले. गतवैभव प्राप्त करून दिले. पेशव्यांनी पुण्याचा विस्तार केला. अटकेपार झेंडे फडकवले. पुढे स्वातंत्र्य चळवळ असो की सामाजिक सुधारणा पुण्याने प्रत्येक ठिकाणी देशाचे नेतृत्त्व केले. असे हे ऐतिहासिक, शांत समृद्ध शहर आता उपनगरांमधून प्रचंड विस्तारले आहे. पुण्याची लोकसंख्या आता पाऊण कोटीच्या घरात पोहोचली आहे. विशेष म्हणजे, यातील निम्मी लोकसंख्या तरुण म्हणजे तिशीच्या घरातील आहे. बाहेरून आलेले सुमारे २० लाख विद्यार्थी इथे शिक्षण घेतात. यातील बऱ्यचसे विद्यार्थी परराज्यांतील उद्योजक, राजकीय किंवा प्रशासनातील उच्चपदस्थ अशा धनवानांच्या कुटुंबातील असतात. हे विद्यार्थी इथल्या खासगी शिक्षण संस्थांमध्ये 'पेमेंट शीट वर शिकतात. आता तर पुण्यातील बहुतेक नामवंत महाविद्यालये 'खासगी विद्यापीठ' होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पुण्यात अशा पैसेवाल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढतच जाणार आहे.

आता यात भर पडली आहे, ती आयटी सेक्टरमध्ये काम करणाऱ्या तरुणाईची. विद्यार्थ्यांना एकवेळ पॉकेटमनीची कमतरता भासेल, पण लाखोंचे पॅकेज घेणाऱ्या नवश्रीमंत तरुणाईला याची चिंता नाही. ते गहण्यासाठी फ्लॅट भाड्याने घेण्यापेक्षा थेट विकतच घेतात. त्यातून शहराभोवती मोठमोठे प्रोजेक्ट, स्काय स्क्रॅपर्स, टाऊनशिप्स उभ्या राहत आहेत. पुण्यात वर्षाला सुमारे लाखभर फ्लॅट विकले जात आहेत. आणि एका फ्लॅटची सरासरी किंमत असते एक कोटी रुपये! 'एक्स्प्रेस वे' मुळे मुंबई ते पुणे हे अंतर तास दीड तासावर आल्याने पुण्यात सेकंड होम घेणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. या सगळ्यामुळे स्थानिक बिल्डर मात्र आणखी गब्बर होऊ लागले आहेत. पुण्याच्या विस्तारात मोठी भर घातली, ती औद्योगिक वसाहतींनी. पिंपरी-चिंचवड आणि चाकण येथील एमआयडीसींनी वाहन उद्योगात जगभर नाव कमावले आहे. जगभरातील नामांकित वाहने इथे तयार होतात. त्यांची उलाढाल ४० हजार कोटींच्या घरात गेली आहे. पुण्यातील हिंजवडी, खराडी, मगरपट्टा परिसरातील सुमारे ५०० आयटी, बीपीओ कंपन्यांत सहा लाख आयटी इंजिनिअर काम करत आहेत. या कंपन्यांची उलाढाल तब्बल एक लाख कोटींच्या घरात आहे. ही समृद्धी पुण्यातील मध्यमवर्गीयांपर्यंतही झिरपते आहे. त्यामुळेच तर पुण्यातील रस्त्यांवर लोकसंख्येपेक्षा जास्त वाहने धावत आहेत. तरुणपणीच असा हाती पैसा हाती खुळखुळू लागल्यावर विरंगुळा हवाच. पुण्यातील नाट्य- सिनेमागृहे त्यासाठी पुरी पडत नाहीत. त्यामुळे पुणे-मुंबई मार्गावर मावळ आणि पनवेलपर्यंत डान्स बार सुरू झाले. तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी त्यावर टाच आणली. नंतर शहराच्या आसपास रेव्ह पार्ट्या सुरू झाल्या. त्यांचे प्रमाण आटोक्यात येत नाही, तोवर आता पब, हुक्का पार्लर, टेरेस बार यांचे पेवच फुटले आहे. नशेत असलेल्या एका बिल्डरच्या अल्पवयीन मुलाने आपली आलिशान कार भरधाव चालवून दोघांचा जीव घेतला. त्यामुळे पुण्यातील नवी पब संस्कृती चर्चेत आली. तरुणांना बेभान करणारे सुमारे १५० पब पुणे आणि परिसरात अहोरात्र चालू असतात. तिथे दारू आणि वेगवेगळ्या ड्रग्जच्या नशेत तरुण थिरकत असतात. पबमधून बाहेर आल्यावर रस्त्यांवरही त्यांचा धिंगाणा सुरू असतो. महिन्यापूर्वीच पुणे पोलिसांनी तब्बल चार हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त केले होते. पुणे कुठल्या वाटेवर निघाले आहे, हे यातून लक्षात येऊ शकते. पुण्यातील उच्चभ्रू वस्त्याच नव्हे, तर शहरातील कुठल्याही रस्त्यांवर आणि पुण्याबाहेर जाणाऱ्या सिंहगड-पानशेत, ताम्हिणी, सासवड आदी घाटरस्त्यांवर वेळी-अवेळी 'धूम स्टाइल बाइक' वरून सुसाट फिरणारी तरुण जोडपी म्हणजे पुण्यात शिक्षणासाठी आलेली

रस्त्यावरच्या अतिश्रीमंतांची मुले. पोलिसमामांच्या हातावर ठराविक 'तुरी' देऊन ती सैराट होतात. शहर आणि उपनगरांमध्ये या मुला-मुलींसाठीच्या हॉस्टेलचा एक स्वतंत्र बिझनेसच उभा राहिला आहे. बहुतेक विद्यार्थ्यांना हॉस्टेलची बंधने आवडत नाहीत. मग मुले आणि मुली मिळून सोसायट्यांमध्ये फ्लॅट घेऊन 'लिव्ह इन रिलेशनशिप' मध्ये राहतात. फ्लॅटमालकांनाही जादा भाडे देणारे हे भाडेकरू परवडतात. काही काळापूर्वी सोसायट्यांमध्ये, रस्त्यांवर हुल्लडबाजी करणाऱ्या या पोरांची कानउघाडणी एखादे ज्येष्ठ पुणेकर काका करताना दिसायचे. आता बदललेल्या वातावरणात ही 'रिस्क' कुणी घेत नाही. परराज्यात राहणाऱ्या पालकांनाही आपल्या या मुलांवर रोज लक्ष ठेवणे शक्य नाही. त्यामुळे 'सातच्या आत घरात' ऐवजी 'सातनंतर बाहेर' असे चित्र शहरात दिसते. मग स्वैर प्रेम, प्रेमाचा त्रिकोण, चौकोन आणि त्यातून बलात्कार, खून अशा अनेक घटनांनी अलीकडच्या काळात शांत पुण्याला हादरे बसू लागले आहेत. यामुळे केवळ पुणेकरांनाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला आपल्या या सांस्कृतिक राजधानीची चिंता वाटू लागली आहे.



## आजची चित्रोळी

शब्दवेधी मी अचूक मारतो बाण
सहजसाध्य तो एकलव्य-अर्जुन
ताणून प्रत्यंचा कानी हात टेकून
जाईन सहज अचूक लक्ष साधून

मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,
विक्रोळी, मुंबई

## पान १ वरून...

### सागरी किनारा प्रकल्पातील बोगद्यांमधील...

पालिका आयुक्तांनी शुक्रवारी या दुरुस्ती कामांची पाहणी केली.

भूमिगत बोगद्यात केलेल्या उपाययोजनांची माहिती अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी यांनी दिली. यावेळी सह आयुक्त चंद्रशेखर चोरे, उप आयुक्त चक्रधर कांडळकर आदी उपस्थित होते

### लोकसभा निकालाआधाची जरांगे पाटलांचं...

पोलिसांच्या या मनमानीपणाचा आणि दडपशाहीचा निषेध करण्यासाठी विविध सामाजिक संघटना शनिवारी एकत्र आल्या होत्या. सकाळी १० पासून वसईच्या परिमंडळ २ च्या पोलीस उपायुक्त पूर्णिमा चौगुले-श्रींगी यांच्या कार्यालयाबाहेर धरणे आंदोल करण्यात आले होते. त्यामध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), कॉंग्रेस, आम आदमी पक्ष आदींबरोबर मी वसईकर, वकील संघटना, पर्यावरण समिती, जनआंदोलन समिती, अंधश्रद्धा निर्मूलन, समाजवादी पक्ष आदी पक्ष आणि संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. माणिकपूर पोलीस मुजोरपणे वागत असून नागरिकांचा आवाज दाबला जात आहे. पोलिसांची कृती नागरिकांच्या मुलभूत स्वातंत्र्यावर गदा आणणारी आहे, असा आरोप विविध सामाजिक संघटनांनी केला आहे. पोलीस भूमाफियांना, बिल्डरांना साथ देतात आणि सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय करतात असा आरोपही यावेळी करण्यात आला.

खोटे गुन्हे दाखल करणारे माणिकपूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने यांना बडतर्फ करा, मारहण करणारे पोलीस उपनिरीक्षक राजशेखर सलगरे यांना निलंबित करा, ॲड आदेश बनसोडे यांच्यावरील गुन्हा मागे घ्या अशी मागणी यावेळी करण्यात आली. पोलीस उपायुक्त पूर्णिमा चौगुले यांच्या कार्यालयाबाहेर आंदोलन असले तरी त्या अन्य कामात व्यस्त असल्याने येऊ शकल्या नाही. मात्र दुपारी सहाय्यक पोलीस आयुक्त पद्मजा बडे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन निवेदन स्वीकारले. सुमारे ५ तास हे आंदोलन सुरू होते.

### उद्योगांच्या समस्यांचा अभ्यास...

राज्य सरकारने नेमलेली ही अभ्यास समिती राज्यात सध्या उपलब्ध असलेल्या औद्योगिक भूखंडाची माहिती पोर्टलवर उपलब्ध करून देणार आहे. तसेच वापरात नसलेल्या औद्योगिक भूखंडाचा वापर करणे, वापरात नसलेले भूखंड पुन्हा ताब्यात घेऊन त्यांचे पुर्नवाटप करणे, एमआयडीसी बाहेरील औद्योगिक समुहांना पायाभूत सुविधा पुरविणे, राज्यातील उद्योगांना भेडसावणाऱ्या विविध उपद्रवी घटकांचा बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना सुचविणे, औद्योगिक क्षेत्राजवळच्या जागेचा निवासी वापर करणे, त्याचबरोबर उद्योगांच्या सहकार्याने राज्यातील बेरोजगार युवकांना उद्योगांशी संबंधित कौशल्य प्रशिक्षण देणे आदी गोष्टींचा अभ्यास ही समिती करणार आहे.

राज्यातील उद्योग परराज्यात जात असल्याप्रकरणी विरोधकांकडून सातत्याने महायुती सरकारवर टीका केली जात आहे. राज्य सरकार उद्योगांना योग्य ती वागणूक देत नाही, हव्या असलेल्या सवलती मिळत नाहीत, अशा प्रकारची टीकाही होत आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणार आहे. या अभ्यासातून जे निष्कर्ष समोर येतील त्यादृष्टीने सरकार पुढे उपाययोजना करणार आहे. यातून राज्यातील उद्योगांसाठी पोषक वातावरण तयार करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

### उल्हासनगर महापालिका अधिकाऱ्यांत...

प्रभारी पदाचा पदभार देतांना एकाच अधिकाऱ्याकडे एक पेक्षा जास्त महत्वाचे पदे दिले. तर काही कर्मचारी व अधिकाऱ्यांना साईडला टाकल्याचे चित्र महापालिकेत आहे.

महापालिकेत महत्वाचे प्रभारी पदे एकाच अधिकारी व लिपिक दर्जाच्या कर्मचाऱ्यांकडे दिल्याने, अन्य कर्मचाऱ्यांच्या नाराजीचा सूर उमटत आहे. ज्या अधिकाऱ्याकडे एका पेक्षा जास्त महत्वाचे पदे दिले. त्यातील बहुतांश अधिकारी व कर्मचारी यापूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात सापडले आहेत. आयुक्त अजीज शेख हे ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणार होते. मात्र निवृत्तीच्या एका आठवड्यापूर्वी ते आयएएस झाल्याने, त्यांना दोन वर्षे सेवा बढती मिळाली आहे. त्यांमुळे त्यांच्या बदलीची चर्चा शहरात सुरू झाली असून आयुक्तांनी एकाच अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे एका पेक्षा जास्त पदे न देता जुन्या व प्रामाणिक कर्मचाऱ्याना न्याय देण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून अप्रत्यक्ष होत आहे. महापालिका आयुक्त अजीज शेख यांनी प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांची मागणी शासनाकडे केली आहे.

### आता ससूनमध्ये नार्कोटिक केसेसमध्ये...

त्याबाबत न्यायसहायक प्रयोगशाळा यांच्याशी सल्लामसलत करून आरोपींच्या लघवीचेही नमुने घ्यावेत. सीएमओ ड्यूटी करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना न्यायवैद्यकीय प्रकरण हाताळणी करताना काही कालावधीनंतर ट्रेनिंग देणे गरजेचे आहे.

आपत्कालीन विभागातून ससूनमध्ये उपचारासाठी दाखल केलेल्या एमएलसी रुग्णांना (इनडोअर एमएलसी) आणि ओपीडी एमएलसी अशी दोन वेगळी रजिस्टर एकत्र ठेवावीत. तसेच सीएमओ यांनी एमएलसी रुग्णांची तपासणी, रक्तनमुने घेणे, लेबल लावणे, सीलबंद करणे व पोलिसांच्या ताब्यात देणे हे व्यक्तिश: तसेच स्वत:च्या देखरेखीखाली करणे गरजेचे आहे.

चौकशी समितीने ससूनचे तत्कालीन अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांच्यावरही ताशेरे ओढले आहेत. त्यात म्हटले आहे की, अधिष्ठाता यांनी या प्रकरणाचे शासकीय व सामाजिक गांभीर्य ओळखून यापूर्वीच वेळेत चौकशी करून याची माहिती शासनाला दिली असती तर, ससून रुग्णालय प्रशासनाकडून स्वत: पोलिस तपासात अधिक सहकार्य झाले असते.

### सरकारी नोकरीमध्ये पदोन्नती मिळणे हा...

पदोन्नती संदर्भात याआधीही अनेक प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झालेली आहे. पदोन्नतीमध्ये आरक्षण मिळण्याबाबतचे प्रकरणही सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्यास राज्ये बांधील नाहीत आणि पदोन्नतीमध्ये आरक्षणाचा दावा करण्याचा कोणताही मूलभूत अधिकार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते.

### एअरपोर्टचा बनावट एन्ट्री पास बनवत...

तो मार्च २०२४ मध्ये १० दिवस गावी गेल्याने त्याचा मूळ एअरपोर्ट एन्ट्री पास कंपनीने जमा करून घेतला. मात्र त्याच्याकडे सदर पासचा फोटोग्राफ होता आणि त्याच्या मदतीने त्याने बनावट एअरपोर्ट पास तयार केला. त्यानुसार त्याला पुढील कारवाईसाठी सहार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.



ठाणे -- मेगाब्लॉक मुले दिवा स्थानकात चाकरमान्यांनी एकच गर्दी केली होते

# रशिया युक्रेन युद्धात भारताची भूमिका जागतिक परिप्रेक्षात महत्वाचीच नाही तर आणखी काय...

**रशिया युक्रेन युद्ध पाहिल्यास भारताची भूमिका आत्तापर्यंत स्पष्ट झाली आहे. भारतानं या भागात शांतता राहावी असं आवाहन प्रथमपासूनच केलं आहे. त्याचवेळी कुणा एकाची भूमिका घेणं टाळलं आहे. भारतावर रशियाकडून तेल आयात धोरणात या युद्धाच्या पार्श्वभूमिवर कोणाताही बदल करण्यात आला नाही. त्यावरुनही जागतिक राजकारण झालं. मात्र भारतानं आपल्या भूमिकेचं समर्थन करताना युद्धाबाबत तटस्थ भूमिका घेतल्यानं गोचीही टाळली आहे. वाचा यासंदर्भातील या क्षेत्रातील जाणकार विवेक मिश्रा यांचा महत्वपूर्ण लेख.**

युरोपमधील रशिया युक्रेन युद्ध, सध्या या भागात शांतता दिसून येत असली तरी ही परिस्थिती नक्कीच एका गंभीर वळणावर आहे. रशिया युक्रेनमधील सर्वात प्रख्यात शहर खार्किवच्या दिशेने वाटचाल करत आहे. युद्धक्षेत्रावरील धोरणात्मक घडामोडी हळूहळू होत असूनही ते रशियाला युक्रेनच्या पूर्वेला नवीन सीमांकनांसह पुनर्स्थित करू शकते. दुसरीकडे, युक्रेनला पाश्चात्य शस्त्रास्त्र पुरवठ्याला एप्रिलमध्ये यूएस कॉंग्रेसने मंजूर केलेल्या 60 अब्ज डॉलर्सच्या मदतीमुळे चांगलीच हवा मिळू शकते. तथापि, अंतिमतः काय होईल हे स्पष्ट होत नसल्यामुळे, युरोपमधील युद्धाच्या विकसित होत असलेल्या परिस्थितीत सर्वांनाच सावध राहावे लागत आहे.

जसजसे रशिया युक्रेन युद्ध वाढत गेले, तसतसे भारताकडून जागतिक अपेक्षा बदलल्या आहेत. भारताला संभाव्य मध्यस्थ म्हणून पाहण्यापासून ते युक्रेन आणि रशिया या दोन्ही देशांमधील भागीदारी असलेला पक्ष म्हणून पाहण्यापर्यंतचा समावेश आहे. जसजसे युद्ध लांबले आहे, तसतसे या अपेक्षा पुन्हा उफाळून आल्या आहेत, सर्वात ठळकपणे 15-16 जून रोजी स्वित्झर्लंडमध्ये होणाऱ्या आगामी युक्रेन शांतता शिखर परिषदेत भारताचा सहभाग आणि आपण काय भूमिका बजावू शकतो, याकडे सर्वांचं लक्ष आहे.

सध्या सुरू असलेल्या रशिया युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारत फार अडचणीशिवाय मार्गक्रमण करत आहे असे दिसते. परंतु भारतापुढील सुप्त आव्हाने कोणती आहेत आणि युरोपीय युद्ध-भौगोलिकदृष्ट्या खूप दूरचे-भारताच्या धोरणात्मक गणितात कुठे बसते? असाही प्रश्न आहे. भारत आणि रशिया यांच्यात 70 वर्षांहून अधिक काळचे संबंध आहेत. संरक्षण आयातीपासून ते धोरणात्मक भागीदारीपर्यंत या दोन देशांमधील संबंध खोलवर आहेत. संरक्षण उपकरणे आणि देखभालीसाठी भारत रशियावर अवलंबून राहणे महत्त्वपूर्ण आहे. परंतु हे घटक जागतिक परिणामांच्या मुद्द्यांवर स्थिती मजबूत करण्यासाठी पुरेसे आहेत का, हेही पाहावे लागेल. या संबंधातील बारकावे केवळ संरक्षण किंवा इतिहासापुरते पाहणे सोपे होईल. प्रथम, शीतयुद्ध काळापासून द्विपक्षीय संबंध स्वतःच मोठ्या प्रमाणात विकसित झाले आहेत. दुसरे, भारताची धोरणात्मक आणि आर्थिक स्थिती लक्षणीयरीत्या बदलली आहे, त्याचा द्विपक्षीय आणि बहुपक्षीय प्रभाव बदलला आहे.

धोरणात्मक स्वायत्तता - रशिया युक्रेन युद्ध सुरू होण्यापूर्वी भारताचे युक्रेन आणि रशिया या दोन्ही देशांशी गतिशील व्यापारी संबंध होते. सध्या सुरू असलेल्या युद्धामुळे दोन्ही देशांचा पुरवठा खंडित झाला आहे. ज्यामुळे भारताच्या ऊर्जा आणि अन्न सुरक्षेवर परिणाम झाला आहे. बहुतेक देशांप्रमाणेच भारतालाही परिस्थितीशी जुळवून घेणे आणि उपाययोजना कराव्या लागत आहेत. या युगात कोणत्याही प्रकारच्या युद्धाविरुद्ध भारताची भूमिका आहे. तथापि, एका पक्षावर दुसऱ्या पक्षाची बाजू घेण्याऐवजी स्वतःच्या हितसंबंधांना पाठिंबा देणारी त्यांची भूमिका आहे. सध्या सुरू असलेल्या रशिया-युक्रेन युद्धात भारताच्या हितसंबंधांचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन तीन गोष्टींवर आधारित असू शकते: धोरणात्मक स्वायत्तता, जागतिक व्यवस्थेची महान शक्ती पुनर्रचना तसंच ऊर्जा आणि संरक्षण गरजा.

रशिया युक्रेन संघर्षाच्या दरम्यान, भारताने तटस्थ भूमिका पाळली आहे. बाजू घेण्यापासून भारत आतापर्यंत दूर आहे. हा दृष्टिकोन अनेक मुख्य घटकांमध्ये रुजलेला आहे. प्रथम, भारताचा ऐतिहासिक दृष्टीकोन युरोपीय खंडातील विवादांमध्ये थेट भाग न ठेवण्यावर भर देतो. ज्याप्रमाणे भारत आशियाई संघर्षांमध्ये बाह्य हस्तक्षेपाला दाद देणार नाही, त्याचप्रमाणे तो युरोपीय व्यवहारात हस्तक्षेप करण्याचे टाळतो. रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरू असलेले युद्ध हा युरोपीय महाद्वीपीय इतिहास आहे, ज्यामध्ये भारताचा सहभाग नसतो. रशिया-युक्रेन युद्धात धोरणात्मक स्वायत्तता राखण्याचा भारताचा निर्णय अनेक कारणांमुळे विवेकपूर्ण आहे. प्रथम, बाजू घेतल्याने भारताला दूरगामी परिणामांसह संघर्षात अडकवण्याचा धोका आहे. युती आणि हितसंबंधांचे गुंतागुंतीचे जाळे पाहता, तटस्थता भारताच्या राष्ट्रीय हितांचे आणि राजनैतिक लवचिकतेचे रक्षण करते.

जागतिक व्यवस्थेची पुनर्रचना - रशिया आणि युक्रेनमधील संघर्षाचे स्वरूप, खरोखरच एक महान शक्ती संघर्ष, विरोधी गटांमध्ये जगाच्या विभाजनाबद्दल चिंता वाढवते. एका बाजूला रशिया आणि दुसऱ्या बाजूला युक्रेनला पाश्चिमात्यांचा पाठिंबा असल्याने, युद्ध संपत नसल्याचं आणि दीर्घकाळ सुरू असून भरकटलेलं दिसतं, ज्यामुळे जागतिक व्यवस्था बिघडते. बदलत्या भू-राजकीय प्रवाहांना रोखण्यात भारताचे हित निहित आहे. विकसित होत असलेली जागतिक क्रमवारी कोणत्याही एका पॉवर ब्लॉकला निश्चितपणे अधोरेखित करत नाही. पक्षपाती भूमिकांपासून दूर राहून, भारतानं आपल्या आर्थिक आणि धोरणात्मक हितसंबंधांचं रक्षण करताना भू-राजकीय परिदृश्यात हालचाली केल्या पाहिजेत.

भू-राजकीयदृष्ट्या, रशिया-युक्रेन युद्ध हा एक मोठा संघर्ष आहे, यातून संरचनात्मकदृष्ट्या जगाला वेगवेगळ्या भागांमध्ये विभाजित करण्याचा धोका आहे. रशिया आणि युक्रेन युद्धाकडे पाहता, पश्चिमेकडून विरुद्ध बाजूंनी तडजोडीचे थोडेसे संकेत मिळत असल्याने, रशिया-युक्रेन युद्धाचा परिणाम अपरिहार्य वाटतो- त्यामुळे जागतिक व्यवस्थेला तडा जाईल. रशिया, चीन, इराण, सीरिया, उत्तर कोरिया आणि इतर काही देश एका बाजूला आणि पश्चिमेकडे दुसऱ्या बाजूला या भगदाडाची चिन्हे आधीच दिसत आहेत. या संघर्षात तटस्थ राहिलेल्या देशांसाठी अर्थातच पुरेशी सुरक्षित जागा आहे.

जागतिक व्यवस्था काही मोजक्या देशांच्या वर्चस्वाखाली आतापर्यंत होती. मात्र सध्याच्या संक्रमणकालीन टप्प्यात रशिया-युक्रेन युद्ध तसंच हमास-इस्रायल संघर्ष या नैसर्गिक संक्रमणामध्ये तोल कुठेच झुकताना दिसत नाही. यामुळे बहु-ध्रुवीयतेला बळकटी मिळते. दुसऱ्या शब्दांत, देश दुसऱ्याशी आर्थिक संबंध राखून राजकीयदृष्ट्या एका बाजूने मतप्रदर्शित करु शकतात. चीन कदाचित रशियाशी मजबूत संबंध आणि पाश्चिमात्य देशांशी तुलनेने स्थिर आर्थिक संबंधांसह या द्वैताचे सर्वोत्तम स्वरूप दर्शवितो.

भारताच्या ऊर्जा आणि संरक्षण गरजा - रशिया हा भारताच्या सर्वात मोठ्या संरक्षण पुरवठादारांपैकी एक असल्याने, या संबंधांना मोठे धोरणात्मक महत्त्व आहे. फेब्रुवारी 2022 पासून, रशियावरील भारताचे तेल अवलंबित्व केवळ पुरवठा साखळीच्या समस्यांमुळेच नव्हे तर किमतींच्या चलनांमुळे गुंतागुंतीचं आहे. ऊर्जा-निर्भर राष्ट्र असूनही, भारताची रशियाकडून होणारी तेलाची आयात जागतिक ऊर्जा बाजारावरील अवलंबित्व अधोरेखित करते. भारतासारख्या मोठ्या उर्जेवर अवलंबून असलेल्या देशासाठी तेलाच्या किमती स्थिरता हा महत्त्वाचा घटक आहे. रशिया-युक्रेन युद्धाबाबत स्पर्धात्मक अंदाज आहेत, ज्यामुळे भारताच्या निवडींमध्ये गोंधळ होऊ नये. युद्धाच्या संभाव्य परिणामासारख्या बाह्य गोष्टींचा भारताच्या स्थितीवर प्रभाव पडू नये. शेवटी, रशिया-युक्रेन युद्धाच्या तुलनेत भारताचे स्वतःचे हित जपण्याचा भारताच्या इतर महान शक्ती संबंधांसाठी काय अर्थ असेल? अमेरिकेसोबतच्या संबंधांसाठी, याचा अर्थ अमेरिकेसोबत भारताची स्वतःची इंटरऑपरेबिलिटी सुनिश्चित करण्यासाठी अधिक निर्बंध आणि अतिरिक्त अंतिम-वापर निरीक्षण सक्ती टाळणे असा होऊ शकतो. दुसरे म्हणजे, भारत-रशिया संबंधातील चीनचा घटक चीन-रशिया संबंधाकडे दुर्लक्ष करून विकसित होण्याची शक्यता आहे, जोपर्यंत नाट्यमय बदलांमुळे चीनचे पश्चिमेसोबतचे संबंध तोडले जात नाहीत.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www. lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@ gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# फ्लेमिंगोंना आता ड्रोनचा धोका, पर्यावरण प्रेमींची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

● नवी मुंबई : विमाने आणि दगडफेक करणाऱ्यांनंतर आता काही लोकांकडून फ्लेमिंगो पाहण्यासाठी तसेच त्यांच्या हालचालींचे शूटिंग करण्यासाठी ड्रोनचा वापर होऊ लागला आहे. यामुळे नवी मुंबईच्या एनआरआय आणि डीपीएस तलाव क्षेत्रातील फ्लेमिंगोच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात आल्यानंतर येथील पर्यावरणप्रेमींनी याबाबत मुख्यमंत्री आणि पोलिसांकडे तक्रार केली आहे. दहा दिवसांपूर्वी एमिरेट्सचे विमान मुंबई विमानतळावर उतरत असताना अपघात होऊन तब्बल ३९ फ्लेमिंगोंचा मृत्यू झाला होता.

अलीकडे, या गुलाबी पक्ष्यांना जवळून पाहण्यासाठी पाणथळ प्रदेशात येणाऱ्या पक्षीप्रेमींसह अनेक नागरिक फ्लेमिंगोंच्या थव्यांवर ड्रोन उडवत आहेत. काहीवेळा हे ड्रोन पक्ष्यांपेक्षा फक्त एक किंवा दोन फूट उंचीवर उडवले जातात, असे नॅटकनेक्ट फाउंडेशनने मुख्यमंत्र्यांकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे.



**ड्रोनचे प्रोपेलर ब्लेड गुलाबी पक्ष्यांना घातक**

वन्यजीव संरक्षण कायदा - १९७२ अंतर्गत येणाऱ्या नाजूक पक्ष्यांना ड्रोनचे धारदार, फिरणारे प्रोपेलर ब्लेड मोठी दुखापत करू शकते. सर्वांत वाईट आणि त्याहूनही धोकादायक गोष्ट म्हणजे ड्रोन, फ्लेमिंगोंच्या उड्डाणावेळीही त्यांचा मागोवा घेतात, असे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले. यामुळे फ्लेमिंगो झोनपासून ड्रोनच्या वापरास मनाई करावी, त्यासाठी सरकारने आदेश द्यावेत. यासाठी त्यांनी मुख्यमंत्र्यांसह राज्याचे पोलिस महासंचालक, नवी मुंबई पोलिस आयुक्त आणि मॅन्ग्रोव्ह सेल यांनादेखील ई-मेल पाठवला आहे.

**असुरक्षित ड्रोन संस्कृतीस आळा बसायला हवा**

'टीएस चाणक्य फ्लेमिंगो झोनमध्ये मी बऱ्याचदा ड्रोन उडतानाची त्रासदायक दृश्ये पाहिली आहेत,' असे सेव्ह फ्लेमिंगोज अँड मँग्रोव्हज फोरमच्या रेखा सांखला म्हणाल्या. ते उडवणाऱ्यांना हे माहीत नसेल की त्यांचे ड्रोन या गुलाबी पक्ष्यांचा जीव धोक्यात आणतात. अशा लोकांना शिक्षित करण्याचे आवाहन केले. ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यात भरतीच्या पाण्याची पातळी वाढल्यावर टीएस चाणक्य, एनआरआय आणि डीपीएस फ्लेमिंगो झोनमध्ये उतरणाऱ्या पक्ष्यांना ड्रोनमुळे त्रास होतो, असे सांगून पक्षीप्रेमी ज्योती नाडकर्णी म्हणाल्या की, 'असुरक्षित ड्रोन संस्कृती विषाणूप्रमाणे पसरत असून, तिला आत्ताच आळा घातला पाहिजे.'

## थोडक्यात

### पादचाऱ्यांना लुटण्याचा कट रचणाऱ्या चार दरोडेखोरांना अटक

● कल्याण : पादचाऱ्यांना लुटण्याचा कट रचणाऱ्या चार दरोडेखोरांना महात्मा फुले पोलिसांनी अटक केली आहे. पाचवा दरोडेखोर अंधाराचा फायदा घेत पळून गेला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. महात्मा फुले पोलिस ठाण्याचे सीनियर पोलीस इन्स्पेक्टर शैलेश साळवी यांनी सांगितले की, गुरुवारी रात्री उशिरा झुंझाराव मार्केटजवळील अनंत हलवाई नावाच्या दुकानाजवळ गोकुळ पंडित सोनवणे, उमेश बैजनाथ सिंग, भुखनकुमार यादव, मुशीद जावेद खान आणि ख्वाजा नावाच्या पाच दरोडेखोरांनी पादचाऱ्यांना लुटण्याची योजना आखली होती.

पादचाऱ्यांना लुटण्यापूर्वीच पोलिस पथकाला खबर मिळाली आणि पाचपैकी चार दरोडेखोरांना पकडण्यात पोलिसांना यश आले. ख्वाजा नावाचा दरोडेखोर अंधाराचा फायदा घेत पळून जाण्यात यशस्वी झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. झडतीदरम्यान पोलिसांनी दरोडेखोरांकडून चाकू, दोरी, मिरची पूड, स्क्रू ड्रायव्हर आदी साहित्य जप्त केले, जे दरोड्यादरम्यान वापरत होते. जितेंद्र चौधरी या पोलिस कर्मचाऱ्याच्या तक्रारीवरून महात्मा फुले पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल केला असून, फरार आरोपी ख्वाजा याचा शोध सुरू आहे.

### कर्जत उपजिल्हा रुग्णालयात अनोळखी मृतदेह नातेवाइकांच्या शोध घेण्यासाठी कर्जत पोलिसांपुढे आवाहन



● कर्जत - कर्जत पोलीस ठाणे अ.मु.र.नं.२४/२०२४ सी. आर. पी. सी मधील १७४ अनोळखी पुरुष जातीचे प्रेत( अंदाजे वय५० )हा अनोळखी पुरुष दि.२६/०४/२०२४ रोजी याला काही लोकांनी अशक्तपणाने तब्येत ठीक नसल्या कारणाने त्यास उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले होते .तो मनोरुग्ण असल्यासारखे वागत असल्याने तेव्हापासून तो तेथे विलिनीकरण कक्षात ॲडमिट होता त्यास अशक्तपणामुळे बोलता येत नव्हते व त्याचेवर योग्य ते औषधोपचार चालू असताना दिनांक २६/०४/२०२४रोजी पहाटे ४:००वाजताचे सुमारास सदर अनोळखी पुरुष पेशंट याचे अचानक छातीत दुखून तो शांत पडल्याने तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी त्यास तपासून तो हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन मयत झाला असल्याचे घोषित केले म्हणून

नमूद मयत अनोळखी पुरुष जातीचे प्रेत वय वर्षे ५०अंदाजेपुर्ण नाव गाव माहित नाही वर्णन निमगोरा,,अंगाने सडपातळ,केस सफेद, मध्यम , अंगात निळसर रंगाचा हाफ बाह्यांचा शर्ट व निळसर रंगाची पॅन्ट, गळयात काळा रंगाचा व त्यात काळसर धातूचे पान,दाढी मिशी सफेद रंगाची व बारीक अशा वर्णन आहे तरी यातील अनोळखी मयताची ओळख पटवून त्याच्या नातेवाईकांचा शोध सुरु आहे याबाबत कोणाला काही एक माहिती असल्यास किंवा अनोळखी मयताची ओळख पटल्यास महिला पोलिस उपनिरीक्षक कर्जत एस के गावंडे किंवा कर्जत पोलिस ठाणे ०२१४८-२२२१०० या क्रमांकावर वर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# जनता दुष्काळात आणि सरकार सुट्टीवर" प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान यांची घणाघाती टिका !

● मुरबाड - शुक्रवार, ३१ मे २०२४ रोजी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या वतीने कोकण विभाग दुष्काळ पाहणी समितीचे अध्यक्ष माजी मंत्री नसीम खान यांच्या अध्यक्षतेखाली व माजी खासदार कुमार केतकर, माजी खासदार भालचंद्र मुणगेकर, माजी खासदार सुरेश टावरे, बी.एम.सी चे माजी उपमहापौर राजेश शर्मा, जिल्हाध्यक्ष दयानंद चोरघे, तालुकाध्यक्ष चेतनसिंह पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत दुष्काळ पाहणी दौरा करण्यात आला आहे.



सदरील दौऱ्यामध्ये टंचाईग्रस्त गाव मौजे पाटगाव (म्हसा) त्यानंतर नानकसवाडी (पवाळे) ह्या गावांमध्ये प्रत्यक्षात नागरिकांशी विशेष करुन महिला वर्गाशी चर्चा करुन शिष्ठमंडळाने पाणी टंचाई, रोड, आरोग्य, मोफत रेशनिंग धान्य आदी विषयांबद्दल जमीनीस्तरावरील माहिती घेतली. तालुकाध्यक्ष चेतनसिंह पवार यांच्या निवासस्थानी मौजे.आंबेळे बु येथे पत्रकार परिषदचे आयोजन करण्यात आले होते ह्या वेळी समितीचे अध्यक्ष नसीम खान यांनी मुरबाड तालुक्यातील गावांमधील नागरिकांशी केलेली चर्चा व त्यातील प्रत्यक्षदर्शी समस्या पाणीटंचाई व इतर समस्यांविषयी पत्रकारांसमोर माहिती दिली तसेच त्यावर येत्या पावसाळी अधिवेशन काळात त्या समस्यांवर उजेड दाखविण्याचे काम कॉंग्रेस पक्षाच्यावतीने करण्यात येईल असे आश्वासन समितीने यावेळी दिले.

पत्रकारांच्या प्रश्नाचे उत्तर देताना नसीम खान यांनी राज्यातील जनता दुष्काळामध्ये होरपळत असुन अनेक समस्यांना तोंड देत असताना सत्तेच्या मुख्य खुर्चीवर असलेले सत्ताधारी मात्र सुट्टीवर असल्याची घणाघाती टिका केली. याप्रसंगी प्रदेश प्रवक्ता संदीप पांडे, भरत सिंग, कल्याणचे सोमनाथ मिरकुटे, अंबरनाथचे ॲड.रसाळ, वरिष्ठ तालुका उपाध्यक्ष भरत विशे, ओबीसी तालुकाध्यक्ष अनिल चिराटे, तानाजी घागस, उमेश चौधरी, जयवंत हरड, दिनेश जाधव, विपुल सुरोशे, प्रकाश पवार, दिलीप शेळके, बाळाराम मार्के, गोविंद निरगुडा, विठ्ठल पारधी, अंकुश पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## माझी वसुंधरा अभियानातील पर्यावरण जागरूकता उपक्रमात नवी मुंबईकरांचा उत्साही सहभाग

● नवी मुंबई - नवी मुंबई शहराच्या पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी नागरिकांच्या सहभागातून नवी मुंबई महानगरपालिका नानाविध उपक्रम राबवित असून शाश्वत पर्यावरण विकासाकडे वाटचाल करीत आहे. या अनुषंगाने नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 21 मे पासून नागरिकांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती करणारे पथनाट्य सादरीकरण, सोसायट्यांमध्ये कार्यशाळा अशा विविध उपक्रमांचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात आले आहे.



या अंतर्गत नागरिक शहराचे पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी कशा प्रकारे हातभार लावू शकतात याविषयी माहिती देणारी व त्यांना त्यासाठी प्रोत्साहित करणारी हस्तपत्रके छापण्यात आली असून त्याचे वितरण पर्यावरण स्वयंसेवकांमार्फत घराघरात जाऊन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे नागरिक विरंगुळ्यासाठी येत असतात अशा जागा आणि नागरिकांची वर्दळ असते अशा ठिकाणी पर्यावरण जागृती स्टॉल लावून नागरिकांना माहिती दिली जात आहे. या सप्ताहभरात आठही विभागांमध्ये प्रत्येकी तीन ते चार मुख्य ठिकाणी हे किऑक्स लावण्यात आले असून नवी मुंबईकर नागरिकांमध्ये पर्यावरण विषयक जनजागृती करण्यात आली आहे.

# ठाणे नशेच्या विळख्यात! चार महिन्यात 'हिट अँड रन' चे 36 बळी, तर 159 गुन्हे दाखल

● ठाणे - पुण्यातील 'हिट अँड रन' प्रकरणानंतर ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डोंगरे यांनी सर्व पोलीस अधिकाऱ्यांना हॉटेल्स, पब आणि बारवर लक्ष ठेवत दारू पिऊन करून वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळं पुन्हा एकदा 'हिट अँड रन' चा मुद्दा चर्चेत आल्याचं बघायला मिळतंय. याच पार्श्वभूमीवर गेल्या चार महिन्यांमध्ये ठाण्यात घडलेल्या 'हिट अँड रन'च्या घटनांविषयी आपण जाणून घेऊया.




ठाण्यामध्ये मागील चार महिन्यांत दारू पिऊन वाहन चालवून हिट अँड रन प्रकरणात 36 जणांचे बळी घेतल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. ठाणे वाहतूक पोलिसांकडं जानेवारी 2024 ते एप्रिल या चार महिन्यात हिट अँड रनचे तब्बल 159 गुन्हे दाखल झालेत. यात 36 जणांचा मृत्यू तर 106 जण कायमचे जायबंदी झाले आहेत. तसंच ठाणे हा नशेखोरांचा अड्डा बनला असून येऊर, हिरानंदानी मिडोज, उपवन, कोठारी कंपाऊंडमध्ये सुरू असलेल्या पब, हुक्का पार्लरमध्ये दररोज नशेचा बाजार भरत असल्यानं रात्री झिंगत निघालेले लोक निष्पापांचा बळी घेत आहेत.

ठाण्याच्या येऊर परिसर आणि खाडी किनाऱ्यावर सुरू असलेल्या बेकायदेशीर ढाब्यांवर मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर दारू पिणारेही दिसतात. याला आता ठाणे पोलिसांनी टार्गेट केल्याचं बघायला मिळतंय. पब, हुक्का पार्लरच्या संस्कृतीत नवीन पिढी करिअरचा ध्यास घेण्याऐवजी मौज, मज्जा, मस्तीमध्ये हरवत चालली असल्याचं भयानक वास्तव यानिमित्तानं समोर आल्याचं पाहायला मिळतंय. यासंदर्भात भाजपा आमदार संजय केळकर यांनी अनेकदा आवाज उठवला. तसंच याबाबत त्यांनी विधानसभेतही प्रश्न मांडले. तसंच ठाण्यात पबमुक्त ठाणे ही मोहीम देखील राबवण्यात आली होती. मात्र, पोलिसांचेच पब आणि हुक्का पार्लर चालकांशी लागेबांधे असल्यानं ही मोहीम 100% पूर्ण होऊ शकली नाही, असा आरोपही संजय केळकर यांनी केला होता.

# ठेकेदार चालवतात का कल्याण डोंबिवली महानगरपालिका ? मनसेने केला सवाल

**महापालिका कर्मचारी व ठेकेदारच्या माणसाची सखोल चौकशी करण्याची आयुक्तांकडे मागणी**

● कल्याण : नेहमीच कोणत्या ना कोणत्या वादात सापडणारी कल्याण डोंबिवली महानगर पालिका पुन्हा एकदा वादात सापडली आहे. ठेकेदारांची माणसं महापालिका अधिकाऱ्यांच्या खुर्चीवर बसून काम करत असून महापलिकेच्या फाईल देखील हाताळत असल्याचा धक्कादायक प्रकार मनसेने समोर आणाला आहे. यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिका ठेकेदार चालवतात का असा सवाल मनसेने उपस्थित केला असून संबंधित महापालिका कर्मचारी व ठेकेदाराच्या माणसाची सखोल चौकशी करण्याची मागणी मनसेचे विभाग प्रमुख कपिल पवार आणि शाखा प्रमुख गणेश लांडगे यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.



मार्च महिन्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून पालिकेवर मोर्चा काढण्यात आला होता. त्यात होर्डिंग संदर्भात देखील चर्चा करण्यात आली होती. परंतु केडीएमसीच्या संबंधित विभागाकडून कुठलीही माहिती न मिळाल्यामुळे मनसेच विभाग प्रमुख कपिल पवार यांनी माहितीचा अधिकार मालमत्ता विभागात होर्डिंग संदर्भात टाकला होता. गुरुवारी याबाबत माहिती घेण्यासाठी पवार मालमत्ता विभागात गेले असता वरिष्ठ सहाय्यक आयुक्त दिलीप सोनवणे यांनी त्यांच्या एका अधिकाऱ्यास माहिती देण्यास सांगितले. परंतु त्या अधिकाराने स्वतः माहिती न देता तेथे (होर्डिंग) ठेकेदाराचा माणूस बसला होता त्याच्याकडून ती माहिती घेण्यास सांगितले. हे मनसेच्या लक्षात आलं असता मनसैनीकांनी तिथे विचारणा केल्यावर त्यांच्यामध्ये गोंधळ निर्माण झाला.

ठेकेदाराचा माणूस हा अधिकाऱ्याच्या खुर्चीवर बसून माहिती कशी देऊ शकतो? व ती खरी असेल की खोटी? आताच मुंबईला झालेली दुर्घटना लक्षात ठेवली असता ही माहिती योग्य मिळणे गरजेचे होत. परंतु हा व्यक्ती ठेकेदाराचा माणूस तिथे सहजपणे फाईल या टेबलवरुन दुसऱ्या टेबल वर करतो त्याला हे अधिकार कोणी दिले? महानगरपालिका कंत्राटी नियमानुसार ठेकेदारांच्या माणसाला चालवायला दिली आहे का? सहा महिन्यापूर्वी ठेकेदाराच्या माणसाकडून फाईल हाताळणे तसेच गहाळ करण्या संदर्भात महानगरपालिकेकडून गुन्हा दाखल झालेला आहे.

एवढी मोठी बाब अधिकाऱ्यांच्या लक्षात का येत नाही? येथील सीसीटीव्ही फुटेज तपासावे व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करावी. तसेच या ठेकेदाराच्या माणसावर महापालिकेतर्फे फौजदारी गुन्हा दाखल करावा अन्यथा पुढील आठ दिवसात आम्हाला उपोषणाला बसावं लागेल असा इशारा मनसेच्या वतीने विभाग प्रमुख कपिल पवार आणि शाखा अध्यक्ष गणेश लांडगे यांनी दिला आहे.

# शिळफाटा रस्त्यावरील मेट्रोची दिखाव्याची कामे बंद करा, मनसे आमदार राजू पाटील यांची 'एमएमआरडीए'वर टीका

● कल्याण : शिवसेना-भाजपवर विकास कामांच्या माध्यमातून नेहमीच टिकेची झोड उठविणारे मनसेचे कल्याण ग्रामीणचे आमदार प्रमोद उर्फ राजू पाटील यांनी महायुतीचा धर्म बाजुला ठेऊन लोकांच्या समस्येची बाजू घेऊन ट्विटरच्या (एक्स) माध्यमातून पुन्हा शासनावर टीका करण्यास सुरूवात केली आहे. शिवसेना-भाजप युतीत सहभागी व्हायचे असल्याने मागील तीन महिन्यांपासून गप्प असलेल्या आमदार पाटील यांनी लोकसभा निवडणुका पार पडताच, पुन्हा राज्य सत्ताधाऱ्यांचे डोळे उघडण्यास सुरुवात केली आहे.




अनेक वर्षांचे कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील वाहतूक कोंडीचे दुखणे या रस्त्याचे रुंदीकरण आणि काँक्रीटीकरणामुळे दूर झाले आहे. गेल्या दोन वर्षापासून या रस्त्यावरून समाधानाने सुसाट प्रवास करत आहेत. हा समाधानाचा श्वास घेत असताना आता कल्याण-शिळफाटा या सर्वाधिक वर्दळीच्या रस्त्यावर कल्याण-तळोजा मेट्रोचे काम सुरू करण्यात आले आहे. हे काम करताना मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाने शिळफाटा रस्त्याचे नवेकोरे काँक्रीट रस्ते, दुभाजक फोडून तेथे अतिभव्य अवजड यंत्रणा खोदकामासाठी आणून ठेवली आहे. त्यामुळे या यंत्रणेमुळे आत्ताच सोनारपाडा, गोळवली भागात वाहन कोंडीला सुरूवात झाली आहे, अशी माहिती आमदार पाटील यांनी 'एक्स'च्या माध्यमातून दिली आहे.


कल्याण-तळोजा मेट्रो रस्ते कामासाठी भूसंपादन पूर्ण झाले आहे. त्यामुळे ज्याठिकाणी मोकळा भूभाग आहे. जेथे वाहन कोंडी होणार नाही अशा ठिकाणी पहिले मेट्रोचे खड्डे आणि इतर कामे सुरू करावीत. जेणेकरून लोकांना त्रास आणि कोंडीत लोकांना अडकावे लागणार नाही. याचा कोणताही विचार न करता शिळफाटा रस्त्यावर डोंबिवलीकरांना दिसेल अशा सोनारपाडा, गोळवली या वर्दळीच्या ठिकाणी अवजड यंत्रणेतून शिळफाटा रस्त्यावर खड्डे मारण्याची कामे एमएमआरडीएने सुरू केली आहेत. मेट्रो आली, काम सुरू झाले. जगाला दिसले आणि याच काळात लोकसभा निवडणुका पण पार पडल्या. हा शोभेचा देखावा मनासारखा पार पडला आहे ना, मग आता शांत बसून उर्वरित भागात मेट्रोचे काम सुरू करा, असा कचकचीत टोमणा आमदार राजू पाटील यांनी कल्याण परिसराचे विश्वकर्माच आपण या अविर्भावात वावरणाऱ्या एका शायनर लोकप्रतिनिधीला अनुल्लेखून लगावला आहे. या विषयाची चर्चा आता सर्वत्र सुरू झाली आहे.

डोंबिवलीकरांना आपल्या गावाजवळून मेट्रो चालली आहे हे दिसावे म्हणून शिळफाटा रस्त्यावर मेट्रोची कामे धडाधड सुरू करण्यात आली आहेत. ऊलट या मेट्रोचा डोंबिवलीकरांना काडीचाही उपयोग नाही. मग हा मेट्रोचा घाईचा देखावा कशासाठी, असा परखड प्रश्न आमदार पाटील यांना केला आहे.

पलावा चौकातील पूल, भुयारी मार्ग, लोढा, रुणवाल, पलावा , रिजन्सी अनंतम या गृहसंकुलांच्या मुख्य रस्त्यावर दररोज वाहन कोंडी होते.

## नेरूळ विभागातील अनधिकृत झोपड्यांवर संयुक्तरित्या कारवाई

● नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्राअंर्तगत नेरूळ एम.आय.डी.सी. क्षेत्रातील महात्मा गांधी नगर व पी.व्ही. मेटल क्वारी येथे बऱ्याच प्रमाणात झोपडयांचे अनधिकृत बांधकाम होत असल्याचे तक्रारी प्राप्त झाल्या असून त्या जागेत सुमारे 100 झोपड्या बांधण्यात आल्या आहेत. सदर झोपडपट्टी मध्ये पत्र्याचे शेड व लाकडाचे खांब उभारण्यात आले होते. त्या परीसरात अवैध प्रकारचे अनेक व्यवसाय होत आहेत व विद्युत पुरवठा चोरी करून सर्व झोपड्यांना पुरविला जात आहे.



दि. 30/05/2024 रोजी नेरूळ विभागाअंतर्गत नेरुळ एम.आय. डी.सी. क्षेत्रातील महात्मा गांधी नगर व पी.व्ही. मेटल क्वारी येथे उभारण्यात आलेल्या अनधिकृत झोपड्या जमिनदोस्त करण्याची संयुक्त कारवाई नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभाग व त्यांचा पोलीस बंदोबस्त, नेरूळ अतिक्रमण विभाग, सिडको व तुर्भे पोलीस स्टेशन चे स्थानिक पोलीस यांच्या मार्फत करण्यात आली. सदर अनधिकृत झोपडपट्टीवर मा. उप आयुक्त डॉ. राहुल गेठे अतिक्रमण विभाग, नमुंमपा यांचे मार्गदर्शनाखाली संयुक्त कारवाई नेरूळ, अतिक्रमण विभाग व सिडको यांचे मार्फत झोपडपट्टी हटाव मोहीमचे आयोजन पोलीस बंदोबस्तात करण्यात आले होते. सदर मोहीमेअंतर्गत नेरुळ एम.आय.डी.सी. क्षेत्रातील महात्मा गांधी नगर व पी.व्ही. मेटल क्वारी येथे उभारण्यात आलेल्या सुमारे 80 झोपड्या निष्कासित करण्यात आल्या आहेत.



# सलमान खानच्या कारवर हल्ल्याची योजना, पाकिस्तानातून हत्यारं, 'असा' होता लॉरेन्स बिश्नोईचा कट

बॉलिवूडचा भाईजान अर्थात सलमान खानला ठार करण्याचा एक कट उघड झाला आहे. या कटात बिश्नोई गँगचा म्होरक्या लॉरेन्स बिश्नोईचा हात आहे हे देखील समोर आलं आहे. समोर आलेल्या माहितीनुसार बिश्नोई गँगने सलमान खानच्या कारवर हल्ला करण्याचा कट रचला होता. पाकिस्तानातून हत्यारं पुरवणाऱ्या एका माणसाकडून हत्यारंही मागणवण्याचीही योजना आखण्यात आली होती. नवी मुंबई पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करत चौघांना अटक केली आहे.

काय होता नेमका कट?

नवी मुंबई पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अभिनेता सलमान खानच्या कारवर पनवेलमध्ये हल्ला करण्याची योजना लॉरेन्स बिश्नोई गँगने आखली होती. बिश्नोईचा मोठा भाऊ अनमोल आणि त्याचा साथीदार गोल्डी ब्रार या दोघांनी पाकिस्तानच्या एका बेकायदा शस्त्र विक्रेत्याकडून एके ४७, एम १६ यांच्यासह अत्याधुनिक बंदुका खरेदी केल्या होत्या आणि त्या महाराष्ट्रात पाठवून त्याच्या कारवर हल्ला करुन त्याला ठार करण्याची योजना आखण्यात आली होती. सलमान खानच्या वांद्रे येथील निवासस्थानावर जो हल्ला झाला, त्याआधी बिश्नोई गँगने हा कट आखला होता. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे.

सलमान खानचं फार्म हाऊसही टार्गेटवर

पोलिसांना ही माहितीही मिळाली आहे की सलमान खानच्या कारवर किंवा त्याच्या पनवेल येथील फार्म हाऊसवर हा हल्ला होणार होता. सलमान खानच्या घरावर गोळीबार झाल्याची घटना ताजी असतानाच आता ही माहिती समोर आली आहे. नवी मुंबई पोलिसांचं हे म्हणणं आहे की त्यांना त्यांच्या खबऱ्यांकडून ही माहिती मिळाली की सलमान खानच्या घरावर हल्ला होण्यापूर्वी त्याच्या कारवर हल्ला होणार होता. त्यानंतर त्यांनी या प्रकरणात एकूण चार जणांना अटक केली. त्यांच्याकडून या प्रकरणाची अधिक चौकशी केली जाते आहे.

घरावरच्या हल्ल्यानंतर सुरक्षा वाढवली

अभिनेता सलमान खान हा बॉलिवूडमध्ये भाईजान आणि दबंग खान या नावाने ओळखला जातो. सलमान खानच्या मुंबईतील वांद्रे येथील घरावर गोळीबार झाला होता. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याच्या घरी जाऊन त्याची भेट घेतली होती. त्याचप्रमाणे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही सलमान खानची भेट घेतली होती. लॉरेन्स बिश्नोई गँगकडून याआधीही असा प्रयत्न झाला आहे. तसंच सलमान खानच्या घरावर हल्ला करण्यात आल्यानंतर त्याची सुरक्षा सरकारने वाढवली होती. आता या प्रकरणात नवी मुंबई पोलिसांनी ज्यांना अटक केली आहे त्यांच्याकडून लॉरेन्स बिश्नोई गँगच्या कटाची ही महत्त्वाची माहिती पोलिसांना मिळाली आहे. सलमान खानच्या कारवर किंवा पनवेल येथील फार्म हाऊसवर हल्ला करण्यात येणार होता असं कळतं आहे. आणखी काय काय माहिती पोलिसांच्या चौकशीत समोर येते ते पाहणंही महत्त्वाचं असणार आहे.

## 'गाढवाचं लग्न'मधील गंगी काळाच्या पडद्याआड, लोककलावंत प्रभा शिवणेकर यांचं निधन



लोककलावंत प्रभा शिवणेकर यांचं निधन झालं आहे. ८१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यात त्यांनी गंगीची भूमिका साकारली होती. या भूमिकेसाठी लोकप्रिय असलेल्या प्रभा शिवणेकर यांचं अल्पशा आजाराने निधन झालं.

'गाढवाचं लग्न' हे हरिभाऊ वडगावकर यांनी लिहिलेलं प्रसिद्ध वगनाट्य आहे. या नाटकाला भारतीय केंद्रशासनाचा राष्ट्रपती पुरस्कार मिळाला होता. वगनाट्यात प्रभा शिवणेकर गंगीची भूमिका करायच्या. 'गाढवाचं लग्न'चे प्रयोग राज्यभरात झाले होते. या प्रयोगांसाठी दादू इंदुरीकरांचं जेवढं कौतुक व्हायचं तितकंच कौतुक व प्रसिद्धी प्रभा शिवणेकर यांना मिळाली. या भूमिकेसाठी प्रभा शिवणेकर यांना भारत सरकारच्या संगीत नाट्य अकादमीनं १९७४ साली तत्कालीन राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरव केला होता. प्रभा शिवणेकर या उत्तम अभिनय करायच्या. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक नाटकांमध्ये काम केलं. मात्र त्यांना ओळख 'गाढवाचं लग्न' या वगनाट्यातून मिळाली. अनेक वर्षे त्यांनी या वगनाट्यात गंगी ही भूमिका साकारुन प्रेक्षकांची मनं जिंकली. आपल्या कारकिर्दीत १०० हून अधिक भूमिका साकारणाऱ्या प्रभा शिवणेकर नाटकांच्या प्रयोगानिमित्त राज्यभर फिरायच्या. गाढवाचं लग्न' या वगनाट्याचे प्रयोग तर राज्यातील अनेक खेड्यांमध्येही झाले होते. सोशल मीडियावरर प्रभा शिवणेकर यांना लोक श्रद्धांजली वाहत आहेत. प्रभा शिवणेकर या अविवाहित होत्या. त्यांच्या निधनाने कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे. प्रभा शिवणेकर आपल्या बहीण व भावांबरोबर राहायच्या. त्यांच्या भावंडांनीच त्यांचा शेवटपर्यंत सांभाळ केला. प्रभा शिवणेकर यांच्यावर मुळशी तालुक्यात त्यांच्या मूळ गावी शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# इंग्लंडविरुद्ध टी-२० मालिका गमावल्यानंतर रमीझ राजा पाकिस्तान संघ व्यवस्थापनावर संतापला

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ या स्पर्धेच्या तयारीसाठी इंग्लंडमध्ये टी-२० मालिका खेळण्यासाठी गेलेला पाकिस्तान संघ अपयशी ठरला. चार सामन्यांच्या या मालिकेत संघाचा २-० असा पराभव झाला. पावसामुळे दोन सामने रद्द झाले, मात्र उर्वरित दोन सामन्यांमध्ये यजमान संघाने बाबर आझमच्या सेनेचा पराभव केला. या पराभवानंतर पाकिस्तानचा माजी क्रिकेटर रमीझ राजा संतापला आहे. पीसीबीचे माजी अध्यक्ष रमीझ राजा यांनी संघ व्यवस्थापनावर टीका केली. या दिग्गज खेळाडूने पाकिस्तान संघात प्रयोग करण्याबाबत चिंता व्यक्त केली.

पाकिस्तान संघाचा सत्यानाश केला –

संघ व्यवस्थापनावर टीका करताना रमीझ राजाने आपल्या यूट्यूब चॅनलवर सांगितले की, "त्यांनी संघासोबत प्रयोग करणे थांबवले पाहिजे. योग्य संघासह सामन्यात प्रवेश केला पाहिजे. तुम्हाला स्ट्राइक रेटची भीती दूर करणे आवश्यक आहे, कारण तुमच्याकडे असे खेळाडू नाहीत. तुम्ही या संघाचा सत्यानाश केला आहे." युवा फलंदाज सॅम अयुबला सलामीवीर म्हणून मैदानात उतरवण्याच्या निर्णयाबद्दल या अनुभवी खेळाडूने खुलेपणाने आपले मत व्यक्त केले.





रमीझ राजा पुढे म्हणाला, "तुम्ही सलामीची जोडी (बाबर आणि रिझवानची) तोडून संघाचा सत्यानाश केला आहे. मधल्या फळीची भूमिकाही योग्य नाही. तुम्ही अष्टपैलू खेळाडूंना मध्यभागी ठेवले आहे आणि दोन विकेटकीपर खेळत आहेत. तुम्ही वेगवान गोलंदाज बदलत आहात. तुमचे फिरकीपटू चेंडू स्पिन करत नाहीत आणि त्यांच्यात आत्मविश्वासाची कमतरता आहे. तुम्ही इमाद वसीमला प्लेइंग इलेव्हनमधून वगळले. कोणत्याही बाजूने हालचाल नाही आणि तुम्ही टी-२० विश्वचषकापूर्वी संघ पूर्णपणे उद्ध्वस्त केला आहे."

सॅम आयुब ठरला फ्लॉप –

नुकत्याच झालेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत सॅम अयुबला सुरुवातीला फॉर्म परत मिळवण्यात अडचणी आल्या. मात्र, त्याने पहिल्या सामन्यात २९ चेंडूत ४५ धावांची झटपट खेळी करत चांगलीच सुधारणा दाखवली. न्यूझीलंडविरुद्धच्या चार सामन्यांमध्ये २१ वर्षीय अयुबने १४.२५ च्या सरासरीने ५२ धावा केल्या आणि मालिकेतील त्याची सर्वोच्च धावसंख्या ३२ धावा होती. अयुब संघात सामील होण्यापूर्वी, बाबर आणि रिझवान पाकिस्तानी संघासाठी सलामीवीर म्हणून खेळत होते, ज्यांनी टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वात नेत्रदीपक सलामी दिली होती. २०२२ मध्ये खेळल्या गेलेल्या शेवटच्या टी-२० विश्वचषकादरम्यान बाबर आणि रिझवान यांनी शानदार फलंदाजी केली. या स्पर्धेत त्याची तीन शतकी सलामी भागीदारीही पाहायला मिळाली.

९ जूनला भारताशी लढत –

आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तानला अ गटात ठेवण्यात आले असून त्यात कट्टर प्रतिस्पर्धी भारत, कॅनडा, यूएसए आणि आयर्लंड या प्रमुख संघांचा समावेश आहे. गुरूवारी टेक्सासमधील ग्रँड प्रेरी स्टेडियमवर यजमान यूएसए विरुद्धच्या सामन्याने त्यांचा प्रवास सुरू होईल. यानंतर बाबर आझमचा संघ ९ जूनला भारताशी भिडणार आहे. हा सामना न्यूयॉर्कमधील नासाऊ काउंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर आहे.

## दिनविशेष

**घटना**

२०२२ : तुर्की / तुर्किये - देशाने तुर्की हे नाव अधिकृतपणे बदलून तुर्किये असे ठेवले.

२०१४ : तेलंगणा - भारताचे २९ वे राज्य झाले.

२००३: मार्स एक्सप्रेस - युरोपियन स्पेस एजन्सीचे प्रोब प्रक्षेपित, युरोपने दुसऱ्या ग्रहावर, मंगळावर जाण्याचा पहिला प्रवास सुरू केला. २०००: अमृता प्रीतम - यांना दिल्ली सरकारचा अकरा लाख रुपयांचा सहस्रकातील कवयित्री हा पुरस्कार जाहीर.

१९९९: भूतान - देशामध्ये दूरचित्रवाणी प्रसारण सुरू.

१९७९: पोप जॉन पॉल (दुसरे) - यांनी (आपल्या मायदेशाला) पोलंडला भेट दिली. कम्युनिस्ट राष्ट्राला भेट देणारे ते पहिलेच पोप होत. १९६६: सर्वेअर प्रोग्राम - सर्वेअर 1 चंद्रावर उतरले, दुसऱ्या जगावर सॉफ्ट-लँड करणारे पहिले अमेरिकन स्पेसक्राफ्ट बनले.

१९६४: पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन (PLO) - स्थापना झाली.

१९५३ : राणी एलिझाबेथ (दुसरी) - यांचा इंग्लंडमध्ये राज्याभिषेक.

१९४९: दक्षिण आफ्रिका - देशामध्ये उच्चवर्णीय लोकांना सोडून इतरांना दुय्यम नागरिक ठरवण्याचा कायदा केला.

**जन्म**

१९८७ : सोनाक्षी सिन्हा भारतीय अभिनेत्री

१९७४ : गाटा काम्स्की - अमेरिकन बुद्धीबळपटू १९६५ : मार्क वॉ - ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू १९६५: स्टीव्ह वॉ - ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू

१९५५ : नंदन निलेकणी - इन्फोसिसचे सहसंस्थापक - पद्म भूषण

१९५५ : मणि रत्नम - चित्रपट दिग्दर्शक पद्मश्री

१९४३ : इलय्या राजा भारतीय संगीतकार

**निधन**

२०२२ : भजन सोपोरी - भारतीय संतूर वादक

२०१४ : अंजन दास भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते (जन्म: १७ नोव्हेंबर १९४९)

२०१४: दुर्यसामी सायमन लौरडुसामी - भारतीय कार्डिनल (जन्म: ५ फेब्रुवारी १९२४) १९९०: श्रीराम शर्मा - भारतीय तत्त्वज्ञानी आणि कार्यकर्ते (जन्म: २० सप्टेंबर १९११)

१९९०: सर रेक्स हॅरिसन - हॉलिवूड अभिनेते (जन्म: ५ मार्च १९०८)

१९८८ : राज कपूर - भारतीय सुप्रसिद्ध अभिनेते, निर्माते व दिग्दर्शक - पद्म भूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार (जन्म: १४ डिसेंबर १९२४)

# 'आईस टी' पिणे चांगलं की वाईट, जाणून घ्या

थंडाव्यासाठी आइस टी पिण्याकडे अनेकांचा कल असतो. पण आइस टी फक्त थंडावा देत नाही तर ते पिल्याने आपल्या आरोग्यासाला देखील बरेच फायदे होतात. पण आईस टी चे आरोग्यासाठी जेवढे फायदे आहेत, तेवढेच त्याचे साइड इफेक्ट देखील आहे. आइस टी योग्य पद्धतीने पिली नाही तर आरोग्याला हानी पोहोचू शकते. जास्त प्रमाणात पिल्याने हेल्थला अनेक प्रकारचे नुकसान होऊ शकते. यासंबंधीत या काही गोष्टी जाणून घ्या आणि काळजी घ्या.

आईस टी' पिण्याचे फायदे

'आईस टी' मध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि पोषक घटक असतात जे आपली रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात, त्यामुळे शरीराचे संसर्गापासून संरक्षण होते.

'आईस टी' च्या सेवनाने हृदयाचे आरोग्य उत्तम राहते. या चहामध्ये फ्लेवोनोइड्स हे चांगेल अँटि ऑक्सिडंट्स असतात, जे ब्लड व्हेसल्सची सूज कमी करतात आणि त्यामुळे हार्ट हेल्थ सह अनेक जुनाट स्थिती टाळण्यास मदत करू शकतात.



### कशी बनवावी आइस टी

आइस टी बनवण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात पाणी गरम करा. पाणी उकळल्यानंतर गॅसची फ्लेम कमी करा आणि नंतर त्यात बेसिक आइस टी टाका. साधारण 10 ते 12 मिनिट हे चांगले शिजवा आणि नंतर गॅस बंद करा. थोड्या वेळानंतर थंड झाल्यावर त्यात मध मिक्स करा. तसेच यात बर्फाचे काही तुकडे टाका. तुम्हाला बर्फ टाकायचा नसेल तर तुम्ही हे एखाद्या तासासाठी फ्रिजमध्ये सुद्धा ठेवू शकता. आइस टी सर्व्ह करण्यापूर्वी त्यात लिंबूचे स्लाइस किंवा थोडासा लिंबाचा रस टाका.

मधुमेहाची समस्या असलेल्या लोकांसाठी आईस टी फायदेशीर आहे कारण आईस टीमध्ये साखरेची पातळी कमी असते. सोबतच शरीरातील इन्सुलिन रेझिस्टन्स नियंत्रणात ठेवण्यास मदत मिळते.

जास्त आईस टी पिण्याचे दुष्परिणाम

जास्त प्रमाणात आईस टी प्यायल्याने किडनी स्टोनची समस्या उद्भवते. जर तुम्ही आधीच स्टोनच्या समस्येने त्रस्त असाल तर हे पिण्यापूर्वी तुम्ही डॉक्टरांशी संपर्क साधावा.

बऱ्याच वेळा लोक साखरेचा सोडा आईस टीमध्ये मिसळतात त्यामुळे शरीरात साखरेची पातळी वाढते.

जास्त आईस टी प्यायल्याने कोलेस्ट्रॉल वाढते परिणामी स्ट्रोकचा धोका उद्भवतो.

## राशि भविष्य

**मेष** – स्वत:मध्ये प्रगती करणारे प्रकल्प हाती घेतलेत तर त्याचा दुहेरी फायदा होईल - तुम्हाला चांगले वाटेल आणि तुम्ही अधिक आत्मविश्वास बाळगू शकाल. जर तुम्ही आपल्या घरातील व्यक्तीकडून काही उधार घेतले असेल तर, आज त्यांना ते परत करा अथवा तुमच्या विरुद्ध ते कोर्टात कार्यवाही करू शकतात.

**वृषभ** – काही जणांसाठी प्रवास केल्याने थकून जाल आणि तणाव वाढला तरी आर्थिकदृष्ट्या फायद्यात राहाल. दूरवर राहणा-या नातेवाईकांकडून अनपेक्षितपणे गोड बातमी मिळाल्याने संपूर्ण कुटुंबासाठी आनंदाचा दिवस ठरेल. कामुक सौंदर्यामुळे अपेक्षित निर्णय मिळू शकेल.

**मिथुन** – स्वत:च्या कामाशी मतलब ठेवा. तिच्या कामात कमीतकमी हस्तक्षेप करा, अन्यथा परावलंबित्व येऊ शकते. आपली सांपत्तिक स्थिती सुधारली असली, तरी खर्चाचे प्रमाण वाढतच असल्यामुळे तुमच्या योजना राबविण्यात अडचणी निर्माण करेल.

**कर्क** – आपल्या पत्नीच्या कामात ढवळाढवळ करू नका, त्याचा तिला राग येऊ शकतो. स्वत:च्या कामाशी मतलब ठेवा. तिच्या कामात कमीतकमी हस्तक्षेप करा, अन्यथा परावलंबित्व येऊ शकते. तुमचे वाचवलेले धन आज तुमच्या कमी येऊ शकते परंतु या सोबतच याच्या जाण्याचे तुम्हाला दुःख ही होईल.

**सिंह** – उच्च कॅलरी असणारा आहार टाळा, ठरलेला व्यायाम आजिबात टाळू नका. चंद्राच्या स्थितीमुळे आज तुमचे धन व्यर्थ खर्च होऊ शकते. जर तुम्हाला धन संचय करायचे आहे तर, तुम्ही आपल्या जीवनसाथी किंवा माता-पिता सोबत या बाबतीत बोलू शकतात.

**कन्या** – आपल्यासाठी काय चांगले आहे हे फक्त तुम्हाला स्वत:लाच माहीत आहे. त्यामुळे ठामपणाने, धाडसी आणि जलद निर्णय घेऊन परिणामांना सामोरे जाण्याची तयारी ठेवा. येनकेन प्रकारे आर्थिक लाभ होतील. कौटुंबिक जबाबदा-या बंधनांकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. निष्काळजीपणा महागात पडू शकतो.

**तूळ** – प्रचंड चिंता आणि तणावामुळे तुमची प्रकृती बिघडेल. गोंधळ व नैराश्य टाळा आणि मानसिक स्पष्टता ठेवा. दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमत: प्राप्त होईल. मुलांकडून तुम्हाला धडा शिकायला मिळेल. मुले अतिशय शुद्ध मनाची असतात.

**वृश्चिक** – मौज, मस्ती, मजा आणि करमणूकीचा दिवस. ज्या लोकांनी अतीत मध्ये आपली धन गुंतवणूक केली होती आज त्या धनाने लाभ होण्याची शक्यता आहे. तुमच्या नवीन योजना, प्रकल्प याविषयी तुमच्या पालकांना विश्वासात घेऊन सांगण्यासाठी काळ उत्तम आहे.

**धनु** – अत्यंत व्यस्त वेळापत्रकातदेखील आपले आरोग्य चांगले असेल. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो. सतत हसतमुख अशा आपल्या स्वभावामुळे आणि आनंदी, उत्साही, प्रेमळ अशा मूड मुळे आपल्या सभोवतालच्या सर्वांना आनंद आणि सुख लाभेल.

**मकर** – जे लोक आतापर्यंत पैश्याचा विचार न करता खर्च करत होते त्यांना आज पैश्याची अधिक आवश्यकता पडू शकते आणि आज तुम्हाला समजेल की, पैश्याची आपल्या जीवनात काय किंमत असते. कुटुंबातील सदस्यांची मदत तुमच्या गरजा पु-या करण्याची काळजी घेईल.

**कुंभ** – ध्यानधारणा आणि स्वत्वाची जाणीव होणे हे लाभदायक सिद्ध होईल. आज कुठल्या पार्टीमध्ये तुमची भेट अश्या व्यक्ती सोबत होऊ शकते जे आर्थिक पक्ष मजबूत करण्यासाठी तुम्हाला महत्वाचा सल्ला देऊ शकतो. सुखद आणि अनोखी संध्याकाळ साजरी करण्यासाठी तुमच्या घरी नातेवाईकांची गर्दी होईल.

**मीन** – आपल्या आधारावर अनेक गोष्टी अवलंबून असतील आणि आपल्या मनाची स्पष्टता निर्णय घेण्यासाठी महत्त्वाची असेल. आर्थिक व्यवहार आणि वायदे अतिशय काळजीपूर्वक सांभाळा. घरातील प्रलंबित कामं आज तुमचा बराच वेळ खातील. एखाद्या इंटरेस्टिंग व्यक्तीची भेट होण्याचा संभव आहे.

# पुणे अपघातात अल्पवयीन मुलाच्या आईला अटक, संपूर्ण अग्रवाल कुटुंब गजाआड

● पुणे : पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापलेले आहे. या अपघात प्रकरणात दररोज नवनवीन माहिती उघडकीस येत आहे. आमदार, पोलीस, ससून रुग्णालयातील डॉक्टर या सर्वांनी मिळून या प्रकरणातील मोठ्या बापाच्या अल्पवयीन पोराला वाचविण्याचे प्रयत्न केल्याचे आरोप होत आहेत. आता या प्रकरणात अल्पवयीन आरोपी वेदांत अग्रवाल याची आई शिवानी अग्रवाल हिलाही ताब्यात घेण्यात आले आहे. पुणे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आज शनिवारी (ता. 01 जून) शिवानी अग्रवालला अटक केली. ज्यामुळे आता या बहुचर्चित प्रकरणात संपूर्ण अग्रवाल कुटुंब हे गजाआड झाले आहे.

आरोपी वेदांत अग्रवाल याच्या आईने म्हणजेच शिवानी अग्रवाल हिने मुलाचे रक्ताचे नमुने बदलले होते, असा आरोप करण्यात आला आहे. तसेच रक्ताचे नमुने बदलण्यासाठी डॉक्टरांना पैसे दिल्याचा आरोप देखील शिवानी अग्रवाल यांच्यावर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी जसजसा तपास करण्यात येत आहे, तसतशी नवनवीन माहिती समोर येत आहे. तसेच, या प्रकरणात अल्पवयीन आरोपी मुलाच्या आईचे नाव समोर आल्यानंतर ती बेपत्ता झाली होती. पण





आज अखेरिस तिलाही अटक करण्यात आली आहे.

शिवानी अग्रवाल हिला अटक करण्यात आल्यानंतर आता तिची आणि तिच्या अल्पवयीन मुलाची एकत्रित चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. तर या प्रकरणात आता अल्पवयीन मुलाची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पुणे गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून करण्यात आली होती. ती मागणी मान्य करत बाल हक्क न्याय मंडळाने पोलिसांना चौकशीसाठी परवानगी दिली आहे. या चौकशीदरम्यान अल्पवयीन मुलाला घटनेसंबंधित अनेक प्रश्न विचारले जातील. परंतु, या चौकशीच्यावेळी बाल हक्क न्याय मंडळाचा एक सदस्य तिथे उपस्थित असेल, असेही सांगण्यात आले आहे.

पुणे अपघात प्रकरणात सध्या अल्पवयीन आरोपीचा बाप विशाल अग्रवाल, आजोबा सुरेंद्र अग्रवाल हे दोघेही तुरुंगात आहेत. विशाल अग्रवाल आणि सुरेंद्र अग्रवाल यांनी पोराला वाचविण्यासाठी ड्रायव्हरला धमकावले होते. ज्यामुळे या प्रकरणात ड्रायव्हरला धमकी देणे आणि त्याचे अपहरण करणे याप्रकरणी गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आहे. आता न्यायालयाने या बाप-लेकास 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, पुणे पोलिसांकडून विशाल अग्रवालवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कलम 201 अंतर्गत पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचाही गुन्हा त्याच्यावर दाखल आहे.

## थोडक्यात

### शनिवारवाडा परिसरात बेवारस पिशवी; बॉम्बची अफवा, पोलिसांकडून तपास सुरू



● पुणे : शनिवारवाड्यात एक बेवारस पिशवी आढळून आली आहे. या घटनेमुळे घबराट उडाली आहे. शनिवारवाडा परिसराची बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाकडून तपासणी करण्यात येत आहे. शनिवार वाड्यात सकाळी दहाच्या सुमारास बेवारस पिशवी सापडली. बॉम्बची अफवा पसरल्याने परिसरात घबराट उडाली. याघटनेची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्या दृष्टीने पुढील तपास करण्यात येत आहे.

### वर्सोवा खाडी भूस्खलन दुर्घटना : दोन दिवसानंतरही चालक ढिगाऱ्याखाली, शोध कार्य सुरूच



● वसई : वर्सोवा खाडी पुलाजवळ घडलेल्या दुर्घटनेला दोन दिवसांचा कालावधी उलटून गेला तरी मातीच्या ढिगाऱ्याखाली अडकलेल्या राकेशकुमार या चालकाचा शोध अजूनही लागला नाही. मागील दिवसांपासून एनडीआरएफच्या पथकाकडून शोध कार्य सुरूच आहे.

बुधवारी रात्री ९ वाजता वर्सोवा खाडी पुलाजवळ सूर्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या बोगद्याचे काम सुरू असताना भूस्खलन होऊन दुर्घटना घडली होती. या दुर्घटनेत मातीच्या ढिगाऱ्याखाली पोकलेने सह चालक ही अडकून पडला आहे. राकेश कुमार यादव असे या चालकाचे नाव आहे. त्याला बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफच्या पथकाकडून बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. यात मोठ्या प्रमाणात मातीचा ढिगारा खचून गेला असून जवळपास ५० ते ६० फुट खचला आहे. त्यामुळे विविध उपाययोजना करून माती बाजूला करण्याचे काम सुरू आहे.

दुसरीकडे आरसीसी ची भिंत ही त्यात कोसळली आहे. भिंत अवजड असल्याने त्याचे सर्व साहित्य बाजूला करताना अडचणी येत आहेत. खाडी किनाऱ्याचा परिसर असल्याने जमिनीखाली अधिकच दलदल आहे. त्यामुळे शोध घेणे आव्हानात्मक असल्याचे सांगण्यात येत आहे. दुर्घटना घडून दोन दिवस उलटून गेले तरीही अजूनही चालकाला बाहेर काढले नसून एनडीआरएफ, पोलीस, अग्निशमन दल यांचे प्रयत्न सुरूच आहेत.

# केरळमध्ये बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव वाढला, केंद्र सरकारचे सर्व राज्यांना तातडीचे आदेश

● केरळ - देशात अनेक ठिकाणी एव्हियन इन्फ्लूएन्झा (H5N1) विषाणूने बाधित झालेले रुग्ण आढळल्यामुळे केंद्र सरकारने शुक्रवारी (३१ मे) सर्व राज्य सरकारांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत. एव्हियन इन्फ्लूएन्झाला बर्ड फ्लू देखील म्हटलं जातं. "कुठेही पक्षी आणि कोंबड्यांचा असामान्य मृत्यू झाल्यास त्या प्रकरणी लक्ष घाला, सावध राहा आणि यासंबंधीची माहिती ताबडतोब पशुसंवर्धन विभागाला कळवा", असं केंद्र सरकारने राज्य सरकारांना पाठवलेल्या आदेशात म्हटलं आहे. केंद्र सरकारने सर्व राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. तसेच त्यांना सांगितलं आहे की, तुमच्या राज्यातील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना, खासगी रुग्णालयांना एव्हियन इन्फ्लूएन्झाची चिन्हे आणि लक्षणांची माहिती द्या. त्याचबरोबर सर्व पोल्ट्री फार्मची तपासणी करा. स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून दिलेले सर्व नियम तिथे पाळले जात आहेत की नाही याची तपासणी करा.

पोल्ट्री फार्म आणि इतर पक्ष्यांमधील संपर्क



टाळण्यासाठी उपाययोजना राबवण्याचे आदेश केंद्र सरकारने दिले आहेत. तसेच एव्हियन इन्फ्लूएन्झापासून बचावासाठी संरक्षणात्मक उपायांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आदेश केंद्र सरकारडून देण्यात आले आहेत. केंद्राने राज्यांना अँटीव्हायरल औषधे, पीपीई किट, मास्क आणि इतर प्रतिबंधात्मक वस्तूंसह सुसज्ज राहण्याचा सल्ला दिला आहे. राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र आणि पशुसंवर्धन तथा दुग्धव्यवसाय विभागाने २५ मे रोजी जारी केलेल्या संयुक्त निर्देशांत म्हटलं आहे की, आंध्र प्रदेश (नेल्लोर), महाराष्ट्र (नागपूर), केरळ (अलापुझ्झा, कोट्टायम आणि पथनामथिट्टा जिल्हे) आणि झारखंडच्या रांचीमधील पोल्ट्रीमध्ये एव्हियन इन्फ्लूएन्झाची प्रकरणं आढळली आहेत.

यंदा मार्च महिन्याच्या पहिल्या आठवडयात नागपूर येथील प्रादेशिक अंडी उबवणी केंद्रातील मृत कोंबड्यांमध्ये बर्ड फ्लू आजाराला कारणीभूत असणारा एच ५ एन १ हा विषाणू आढळला होता. तर एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात याच बर्ड फ्लूचा धोका जगभरातील तज्ज्ञांनी अधोरेखित केला आहे. यूके-आधारित टॅब्लॉइड डेली मेलच्या अहवालानुसार, "कोविड १९ च्या साथीच्या आजारापेक्षा १०० पट वाईट परिस्थिती निर्माण करण्याची आणि मृत्यू दर वाढवण्याची ताकद बर्ड फ्लूमध्ये असू शकते."

तज्ज्ञांच्या हवाल्याने दिलेल्या या अहवालात नवीन साथीच्या आजाराच्या धोक्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती. संशोधकांनी बर्ड फ्लूच्या H5N1 व्हेरिएंटवर चर्चा करून हा विषाणू प्रचंड वेगाने पसरत असल्याची माहिती दिली होती. या विषाणूमध्ये करोनासारखी जागतिक महामारी निर्माण करण्याची क्षमता असल्याची भीती शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे.

# नाशिक विभागीय आयुक्तपदी डॉ. प्रवीण गेडाम यांची नियुक्ती



● नाशिक : विभागीय आयुक्तपदी डॉ. प्रवीण गेडाम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी गेडाम यांनी नाशिक महानगरपालिकेत आयुक्त म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. तत्पूर्वी ते जळगावमध्ये कार्यरत होते. जळगावचा घरकुल घोटाळा उघडकीस आणण्यात त्यांची महत्वाची भूमिका राहिली आहे.

नाशिकचे विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे हे निवृत्त झाल्यामुळे रिक्त होणाऱ्या पदावर कृषी विभागाचे प्रधान सचिव डॉ. गेडाम यांची नियुक्ती करण्यात आली. विभागीय आयुक्त कार्यालयात गमे यांच्या सेवानिवृत्ती समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी डॉ. गेडाम यांनी पदभार स्वीकारला. डॉ. गेडाम यांनी २०१४ मध्ये नाशिक महापालिकेत आयुक्त म्हणून काम केले आहे. मागील सिंहस्थ कुंभमेळ्यात त्यांच्या कामाचा धडाका नाशिककरांना दिसला होता. महापालिकेच्या कारभारात शिस्त आणण्यासाठी ते आग्रही राहिले होते. तेव्हा मुदतपूर्वीच त्यांची बदली झाली होती. त्यांच्या बदलीच्या निषेधार्थ नाशिककर रस्त्यावर उतरले होते. कपाट प्रकरणात बांधकाम व्यावसायिकांवर कारवाईचा बडगा उगारण्यासाठी गेडाम यांनी पाठपुरावा सुरू केल्यामुळे लोकप्रतिनिधी त्यांच्या विरोधात गेले. बांधकाम व्यावसायिकांच्या चुकांवर बोट ठेवणारे, शहरात धडक अतिक्रमण मोहीम राबवत नगरसेवकांनाही दणका देणारे, उत्पन्न वाढीसाठी अकस्मात सर्वेक्षण मोहीम राबविणारे अशी डॉ. गेडाम यांची प्रतिमा निर्माण झाली होती.

# The wealthy Paris woman who gave Pune an enduring gift

● From the grand boulevards of Champs-Elysees in Paris to the quiet elegance of Pune, it was a long way from home for a young girl from an affluent family. But Soeur Juliette Pierre-Marie was following a higher calling. She joined a religious order and was led by a sense of service to come to India, and Pune, where she worked with several organisations and set up a centre to empower visually-impaired women.

What is less known about Pierre-Marie is that a lot of young people in Pune today speak and read French because she was determined to bring the Alliance Française to the city.

Alliance Française is a French organisation set up in 1884 by luminaries such as Louis Pasteur and Jules Verne. The first Alliance Française internationally was launched in Barcelona, Spain. Within five years, the Alliance Française in India was inaugurated. Over the next decades, the organisation spread across the major cities, such as Delhi, Kolkata and Chennai. But, even almost a century later, it had still not arrived in Pune.

Since Mumbai had a well-established Alliance Française, several French



nationals in Pune felt the need for such an institute in the city. The person who took the main initiative was Pierre-Marie, who had left her religious order to carry out social work in Pune. She pushed for Alliance Française de Pune (AFP) because Bombay was too far away. Among the people who supported her was Madame Parulekar, née Pommeret, the wife of the founder of the Sakal paper, Nanasaheb Parulekar. In 1974, AFP opened its doors in the city.

In the 1970s and 80s, Pune was a sleepy town famous as a pensioners' paradise. It did have a large student population, though, many of whom were keen to go abroad to study. Learning a foreign language was seen as an asset. Students from Wadia College, Fergusson College and Brihan Maharashtra College of Commerce (BMCC) began to flock to AFP for classes.

# Delhi's maximum temperature of 52.9 degrees due to Mungeshpur station sensor error: IMD

● When Delhi's Mungeshpur weather station recorded a maximum temperature of 52.9 degrees Celsius on May 29, it was on account of "malfunctioning of the sensor," the India Meteorological Department (IMD) has said.

Experts from the IMD have found that the automatic weather station (AWS) sensor at Mungeshpur was reporting temperatures "about 3 degrees Celsius higher than the maximum temperature reported by the standard instrument."

The maximum temperature of 52.9 degrees at Mungeshpur was an all-time high for any location in India and this had prompted the IMD to verify the



recording at the station. A committee of experts from the IMD was constituted to review the reading at Mungeshpur, which, according to the IMD, was "an outlier compared to other observatories in Delhi," and this reading had "exceeded the earlier all-time highest maximum temperature of 48.4 degrees at Palam on May 26, 1998."

On the same day, no other observatory in Delhi had crossed the 50-degree mark. At other stations, the maximum temperature was between 45.2 degrees and 49.1 degrees.

The committee evaluated the AWS sensor at Mungeshpur and compared it with other automatic weather stations in the city. While the maximum temperature recorded at Mungeshpur was found to be 3 degrees higher than standard instruments, no significant discrepancies were found in temperatures reported by other AWS stations in Delhi, the IMD said.

"Necessary remedial measures are being taken up by the IMD to avoid the repetition of such errors in AWS," the IMD said in a statement.

Mungeshpur recorded a maximum temperature of 48.8 degrees on May 27, 49.9 degrees on May 28, and 52.9 degrees on May 29.

At an automatic weather station, weather parameters are recorded and transmitted automatically, without manual intervention. In contrast, at a manual observatory, observations are taken manually every three hours. On May 29, the manual observatory at Safdarjung, which serves as a marker for the city, recorded a maximum temperature of 46.8 degrees Celsius.

# इमारतींवर अनधिकृत होर्डिंग उभारल्यास आता गृहनिर्माण संस्थांवर गुन्हे

● पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहरातील काही गृहनिर्माण संस्थांनी नियमित खर्च भागविण्यासाठी इमारतींवर, तसेच आवारात होर्डिंग उभारल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनधिकृत होर्डिंग उभारणाऱ्या गृहनिर्माण संस्थांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे. तसेच होर्डिंगवरील कारवाईचा खर्चही वसूल केला जाणार आहे.

मोशीतील होर्डिंग कोसळल्यानंतर महापालिकेने शहरातील अनधिकृत होर्डिंगचे सर्वेक्षण केले. त्यात २४ होर्डिंग अनधिकृत आढळले असून होर्डिंगधारक, होर्डिंगवरील जाहिरातदार व जागामालक अशा ७२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. परवानगीपेक्षा मोठ्या आकाराच्या ३४१ होर्डिंगधारकांना नोटिसा बजाविल्या आहेत. जाहिरात व फलक नियंत्रण नियमानुसार खासगी जागेत होर्डिंग उभारण्यासाठी महापालिकेची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्याच्या दृष्टीने सर्व अनधिकृत होर्डिंग काढले आहेत. परंतु, शहरातील काही गृहनिर्माण संस्थांनी त्यांचा नियमित खर्च भागविण्यासाठी त्यांच्या मालकीच्या जागेत, इमारतींवर होर्डिंग उभारल्याचे निदर्शनास आले आहे.

राज्य शासनाच्या जाहिरात फलकाबाबतच्या ९ मे २०२२ च्या अधिसुचनेनुसार ज्या इमारतींचे स्थिरता प्रमाणपत्र नाही. इमारतींबाबत महापालिका स्तरावर, न्यायालयात कारवाई प्रलंबित आहे. इमारतीच्या मालकाला कायदेशीररीत्या काम थांबविण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. संपूर्ण इमारत अनधिकृत असेल. इमारत धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली किंवा धोकादायक म्हणून नोटीस बजावलेल्या इमारतींवर होर्डिंग उभारता येत नाहीत.



स्थापत्यविषयक लेखापरीक्षण, शासन किंवा महापालिका संरचना अभियंत्याकडून संरचना मजबुतीचे प्रमाणपत्र सादर केल्यास, परवानगी अर्जासोबत गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेने होर्डिंगसाठी परवानगी दिल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र किंवा संस्थेच्या सभासदांपैकी दोन तृतीयांश सभासदांच्या सहमतीने दिलेले ना- हरकत प्रमाणपत्र, ना-हरकत प्रमाणपत्रास संस्थेच्या सर्वसाधारण सभेने रितसर मंजुरी दिलेल्या ठरावाची प्रमाणित प्रत सादर केल्यास होर्डिंग उभारण्यास परवानगी दिली जाईल, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

ज्या गृहनिर्माण संस्था विनापरवाना होर्डिंग उभ्या करतील. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील. होर्डिंग काढण्यासाठीचा येणारा खर्चही गृहनिर्माण संस्थांकडून वसूल केला जाणार असल्याचे आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त संदीप खोत यांनी सांगितले.

# Battle of prestige to play out after first general polls with split NCP, Shiv Sena in fray

● MUMBAI - The ruling and opposition sides in Maharashtra, while also exuding confidence, are on the edge as exit poll results are set to be announced following the Lok Sabha elections which ended today.

The exit polls in Maharashtra, expected after voting in the final phase concludes at 6 pm, provide early indications of potential winners before the official results are declared. Lok Sabha polls were held in Maharashtra in 48 seats across five phases between April 19 till May 20. Of a total of 9.29 crore voters in Maharashtra, 5.70 crore cast their votes, in a marginal increase compared to 2019 elections



when 60.79 per cent of voters in the state cast their votes. The results are scheduled for June 4.

A resurgent BJP under the leadership of Prime Minister Narendra Modi registered two successive election victories – in 2014 and 2019. In the 2019 Lok Sabha elections, the NDA alliance won 41 seats, the UPA alliance won five seats, while the AIMIM and an Independent won one seat each.

# ईशान्येतील राज्यांना रेमल चक्रीवादळाचा फटका; पूर-भूस्खलनामुळे 15 जणांचा मृत्यू

● मुंबई, प्रतिनिधी :

रेमल चक्रीवादळाचा ईशान्येकडील जवळपास सर्वच राज्यांना मोठा फटका बसला आहे. रेमल चक्रीवादळच्या प्रभावामुळे चार राज्यांमध्ये अतिवृष्टी आणि भूस्खलनात आतापर्यंत १५ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. या चक्रीवादळामुळे शेकडो घरांची पडझड झाली असून अनेक पिकांचे नुकसान झाले आहे. आसाममध्ये 12 आणि मणिपूरमध्ये 3 जणांचा मृत्यू झाला आहे. आपत्तीग्रस्त आसाम, त्रिपुरा, मणिपूरमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी दु:ख व्यक्त करत, सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. विशेष म्हणजे ज्या राज्यांना या रेमल चक्रीवादळाचा मोठा फटका बसला त्यावरून अमित शहा यांनी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून परिस्थितीची माहिती घेतली.

रेमल चक्रीवादळामुळे ईशान्येतील आठही राज्यांतील रस्ते आणि रेल्वे संपर्कावरही परिणाम झाला आहे.






रेमल चक्रीवादळाचा सर्वाधिक तडाखा मिझोराम राज्याला बसला आहे. मिझोराममध्ये 29 लोकांचा मृत्यू झाला आहे. आसाममध्ये शुक्रवार 31 मे रोजी 6 जणांचा मृत्यू झाल्याने आतापर्यंत एकूण मृतांची संख्या 12 झाली आहे. आतापर्यंत 11 जिल्ह्यांमध्ये 3.5 लाखांहून अधिक लोक बाधित झाले आहेत.

याशिवाय, ब्रह्मपुत्रा आणि बराक नद्या तसेच त्यांच्या उपनद्या धोक्याची पातळी ओलांडून वाहू लागल्या आहेत. करीमगंजमध्ये चार बंधाऱ्यांना तडे गेले आहेत. नागाव, करीमगंज, हैलाकांडी, पश्चिम कार्बी आंगलांग, कचार, होजई, गोलाघाट, कार्बी आंगलिंग आणि दिमा हासाओ जिल्ह्यात सर्वात बिकट परिस्थिती आहे.

मेघालयातील लुम्स्लाम भागात मुसळधार पावसामुळे राष्ट्रीय महामार्ग-6 चा 20 मीटरचा भाग वाहून गेला आहे. यामुळे कचार, करीमगंज आणि हैलाकांडी जिल्ह्यांचा राज्याच्या इतर भागांसह आणि ईशान्येकडील भागांचा रस्ता संपर्क तुटला आहे. अनेक वाहने अडकून पडली आहेत.

कचरमध्ये सर्वाधिक 1,19,997 लोकांना पुराचा फटका बसला आहे. त्याच वेळी, नागावमध्ये 78,756, होजईमध्ये 77,030, करीमगंजमध्ये 52,684 आणि हैलाकांडीमध्ये 14,308 लोक बाधित झाले आहेत. आसामचे जलसंपदा मंत्री पियुष हजारिका यांनी पूरस्थितीचा आढावा घेतला.

### पुढील दोन दिवस मुसळधार पाऊस

■ हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, रेमालच्या प्रभावामुळे नैऋत्य मोसमी पावसाने नियोजित वेळेपूर्वी आसामसह पूर्व भागात प्रवेश केला आहे.

### मतमोजणीसाठी विशेष व्यवस्था

■ आसामचे मुख्य निवडणूक अधिकारी म्हणाले की, पॉवर बॅकअप आणि पर्यायी ठिकाणांहून अधिकृत पोर्टलवर डेटा फीड करण्याची व्यवस्था यासह मतांच्या मोजणीसाठी व्यापक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

## मुंबईत अग्नितांडव! ताडदेव परिसरातील गोदामाला भीषण आग



● मुंबई, प्रतिनिधी :

मुंबईत आगीच्या घटना काही थांबायचं नाव घेत नाहीयेत. डोंबिवली आणि धारावीतील आगीच्या घटना ताज्या असताना आता मुंबईतील गोवालिया टँक, ताडदेव इथं शुक्रवारी (31 मे) रात्री 9:00 वाजेच्या सुमारास आग लागली. औद्योगिक वसाहतीमधील एका गोदामाला भीषण आग लागल्यानं कामगारांची पळापळ झाली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पाच ते आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आणि अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आलं.

जीवितहानी नाही, मात्र वित्तहानी मोठी : मिळालेल्या माहितीनुसार, ताडदेवमधील पट्ठे बापूराव मार्ग, 249, तालमिकीवाडी इथं शुक्रवारी रात्री एकमजली इंडस्ट्रियल इस्टेटला आग लागली. प्लास्टिकच्या गोदामाला ही आग लागल्याची माहिती समोर आली आहे. प्लास्टिकला आग लागल्यामुळं आगीचा भडका अधिक मोठा झाला. त्यामुळं हवेत आगीचे मोठ-मोठे लोळ दिसत होते. तसंच परिसरात धुरांचे लोटही मोठ्या प्रमाणात झाल्यामुळं परिसरात अंधार पसरला. दरम्यान, सुदैवानं या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, यावेळी मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मुंबईत वाढत्या आगीच्या घटना : मागील काही महिन्यांपासून मुंबईत आगीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. चार दिवसांपूर्वी मुंबई उपनगरातील डोंबिवली येथे एका केमिकलच्या कंपनीला मोठी आग लागून कित्येक लोकांचे बळी गेले होते.

## 30 तास लेट विमान अन् AC बंद, प्रवाशांच्या प्रकृतीत बिघाड



● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

दिल्लीहून सॅन फ्रान्सिस्कोला जाणाऱ्या एअर इंडियाच्या विमानातील प्रवाशांचे प्रचंड हाल झाल्याची धक्कादायक बातमी समोर येत आहे. दिल्लीहून सॅन फ्रान्सिस्कोला जाणारे एअर इंडियाचे विमान तब्बल 30 तास लेट झाले. तसेच, त्या विमानातील एसीही अनेक तास बंद असल्याने विमानातील प्रवाशांच्या प्रकृतीत बिघाड झाला. अनेक प्रवासी बेशुद्धही झाले. जवळपास 200 प्रवासी या विमानात होते. याप्रकरणी प्रवाशांनी सोशल मीडियावर नागरी विमान वाहतूक मंत्रालयाकडे तक्रार केली. त्यानंतर डीजीसीएने एअर इंडियाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

### एअर इंडियाला नोटीस

मिळालेल्या माहितीनुसार, एअर इंडियाचे AI-183 हे विमान गुरूवारी दुपारी 3.30 वाजता IGI वरून उड्डाण करणार होते. परंतु, या विमानाला 30 तास उशीर झाला. केबिनमध्ये तापमान नियंत्रण नसल्यामुळे एअर इंडियाच्या दोन्ही विमानांना उशीर झाला. या काळात प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. उड्डाणांच्या उशीरामुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल काही लोकांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आपला संतापही व्यक्त केला होता.

## इंडिया आघाडीकडून राहुल गांधीच पंतप्रधानपदाचे उमेदवार, राऊतांकडून शिक्कामोर्तब



● मुंबई, प्रतिनिधी :

देशातील लोकसभा निवडणुकीचा निकाल 04 जून रोजी जाहीर होणार आहे. आज शनिवारी (ता. 01 जून) देशात सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदान होत असून आता सर्वांना 04 जूनची प्रतीक्षा आहे. एकीकडे एनडीएकडून पुन्हा एकदा म्हणजेच तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच पंतप्रधानपदाचे उमेदवार असताना आता इंडिया आघाडीकडूनही पंतप्रधानपदाचा उमेदवार निश्चित करण्यात आलेला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी याबाबतची माहिती दिली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी राहुल गांधी हे पंतप्रधानपदाचे उमेदवार असल्याचे सांगितल्यानंतर आता खासदार राऊतांनीही यावर शिक्कामोर्तब करत आम्ही राहुल गांधी यांच्यासोबत उभे आहोत, असे प्रसार माध्यमांना सांगितले आहे

## केज तहसीलदार, कोतवाल सापळ्यात

### धाराशिव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

● छत्रपती संभाजीनगर , प्रतिनिधी :

रास्त दुकानदारावर कारवाई व परवानाही रद्द न करण्यासाठी केज तहसील कार्यालयातील तहसीलदार व कोतवाल २० हजार रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी धाराशिव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळयात अडकले. अभिजीत लक्ष्मण जगताप व मच्छिंद्र मारोती माने, अशी लाच मागणाऱ्यांची नावे असून दोघे केज तहसील कार्यालयात अनुक्रमे तहसीलदार व कोतवाल पदी आहेत. तक्रारदाराकडून ४० हजार रुपयांची मागणी करून २० हजार स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळयात अडकले.

या प्रकरणी केज पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील तक्रारदार यांचे रास्तभाव धान्य दुकान असून, त्यांचे रास्त भाव धान्य दुकानामध्ये शासनाकडून मिळालेला



धान्यसाठा व तक्रारदार यांनी ग्राहकांना वाटप केलेले धान्य यामध्ये तफावत असल्याचे सांगून तक्रारदार यांचेवर कारवाई न करण्याकरीता तसेच त्यांचा रास्त भाव धान्य दुकानाचा परवाना रद्द न करण्याकरीता तहसिलदार अभिजीत जगताप याने कोतवाल मच्छिंद्र माने याचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडे पंच साक्षीदार यांच्यासमक्ष ४० हजार रुपये लाच मागणी करुन प्रोत्साहन दिले. तसेच माने याने तडजोडी अंती २० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य करुन पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचेकडुन

## लोकशाही शक्तींकडून हुकुमशहांचा पराभव झाला तरच खरा लोकशाहीचा उत्सव' - मल्लिकार्जून खर्गे

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :



काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी लोकांना परिवर्तनासाठी मतदान करण्याचे आवाहन करताना म्हटले आहे की, लोकशाही शक्ती जेव्हा हुकूमशाहीचा पराभव करतील तेव्हाच देशात खरा 'लोकशाहीचा उत्सव' यशस्वी मानला जाईल.

ते म्हणाले की, देशात संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी मतदानाचा शेवटचा टप्पा सुरू आहे आणि इंडिया आघाडी हुकूमशाही शक्तींशी धैर्याने लढत आहे. लढाई आता अंतिम टप्प्यात आली आहे. प्रत्येक टप्प्यात जनता आमच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहात आहे. सहा टप्प्यांनंतर लोकांना आम्हाला विजयी पाहायचे आहे," असे खर्गे यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.जनतेला काँग्रेसने दिलेले हमीभावाचे आश्‍वासन पूर्ण झालेले पहायचे आहे असेही ते म्हणाले. मतदान किंवा निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव मानला जात असला तरी लोकशाहीचा हा उत्सव तेव्हाच यशस्वी मानला जाईल जेव्हा लोकशाही शक्ती हुकूमशाही शक्तींचा पराभव करतील, असे खर्गे म्हणाले..

## २०४७ पर्यंत मी काम करावं ही तर श्रींची ईच्छा – पंतप्रधान नरेंद्र मोदी

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

देशभरात लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या अर्थात सातव्या टप्प्यासाठी मतदान होत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेलं एक विधान पुन्हा चर्चेत आलं आहे. याआधी एका मुलाखतीमध्ये "माझा जन्म आईच्या पोटी झाला नसून मला देवानं पाठवलं आहे", असं विधान मोदींनी केलं होतं. या विधानावरून विरोधकांनी भारतीय जनता पक्षाला व खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही लक्ष्य केलं होतं. त्यानंतर आता मोदींनी केलेलं आणखी एक विधान चर्चेत आलं आहे. गेल्या आठवड्यात एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना मोदींनी केलेलं विधान शेवटच्या टप्प्याच्या निवडणुकीत पुन्हा व्हायरल होऊ लागलं आहे.

फायनान्शियल एक्स्प्रेसनं यासंदर्भातलं सविस्तर वृत्त दिलं आहे. "माझा असा



विश्वास आहे की प्रत्यक्ष देवानंच मला विशिष्ट जबाबदारी देऊन इथे पाठवलं आहे. 'विकसित भारत'चं ध्येय साध्य करण्यासाठी देवानं मला २०४७ सालापर्यंत दिवसाचे २४ तास आणि आठवड्याचे सातही दिवस काम करण्याचे आदेश दिले आहेत", असं पंतप्रधान नरेंद्र मोदी या कार्यक्रमात म्हणाले.

"मला वाटतं देवानंच मला या विशेष हेतूसाठी पृथ्वीवर पाठवलं आहे. २०४७ सालापर्यंत विकसित भारताचं लक्ष्य पूर्ण करण्याचं ध्येय साध्य करायचं आहे. ईश्वर मला त्यासाठी मार्ग दाखवतो. ईश्वरच त्यासाठी मला ऊर्जा देतो. २०४७ सालापर्यंत हे लक्ष्य मी साध्य करेन याचा मला पूर्ण विश्वास आहे. जोपर्यंत ते लक्ष्य साध्य होत नाही, तोपर्यंत ईश्वर मला परत बोलवणार नाही", असंही मोदी यावेळी म्हणाले.

दरम्यान, यावेळी मोदींनी सर्वात कार्यक्षम केंद्रीय निवडणूक आयुक्त म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टी. एन. सेशन यांचाही उल्लेख केला. "१९९१ साली तत्कालीन काँग्रेस नेते राजीव गांधी यांची २१ मे रोजी हत्या झाली, तेव्हा निवडणुका २२ दिवस पुढे ढकलण्यात आल्या होत्या. तोपर्यंत मतदानाचा फक्त पहिला टप्पा पार पडला होता. त्यानंतर १२ जून ते १५ जून या काळात निवडणूक पूर्ण झाली. जेव्हा एखाद्या उमेदवाराचं निधन होतं, तेव्हा फक्त त्याच मतदारसंघातली निवडणूक रद्द केली जाते. पण १९९१ साली देशभरातली निवडणूक पुढे ढकलण्यात आली", असं मोदी म्हणाले.

## पोलीस पाटलाच्या मुलीचा प्रताप; दोघांना उडवलं, एकाचा मृत्यू

● शिरूर, प्रतिनिधी :



पुण्यातील कल्याणीनगर येथील पॉर्शे कार अपघाताची घटना ताजी असतानाच, शिरूर तालुक्यातूनही अशीच एक घटना समोर आली आहे. पोलीस पाटलाच्या अल्पवयीन मुलीने दुचाकी वरील दोघांना उडवल्याची घटना घडली आहे. या घटनेत अरुण विठ्ठल मेमाणे ( वय ३०) यांचा मृत्यू झाला असून महेंद्र रावसाहेब बांडे हे गंभीर जखमी झाले आहेत. अल्पवयीन मुलगी पीकअप गाडी चालवत होती. या गाडीने मृत तरुणाला ३० ते ४० फूट फरपटत नेल्याचेही समजते.

शिरूर तालुक्यातील वडगाव बांडे-आरणागाव रोडवर पोलिस पाटील संतोष लेंडे यांनी आपल्या अल्पवयीन मुलीला पीक अप गाडी चालवण्यासाठी दिली होती. पाटील स्वतः दुसऱ्या सीटवर बसले. याच रस्त्यावरून दुचाकीस्वार महेंद्र बांडे आणि अरुण मेमाणे हे न्हावरेगावाकडे जात होते. यावेळी मात्र पीक अप गाडीची दुचाकीला जोरात धडक बसून दुचाकीवरील तरुण खाली पडले. यातील अरुण मेमाणे हा पीक अपच्या मागच्या चाकाखाली आल्याने त्याला गाडीने जवळपास ३० फुटांपर्यंत फरपटत नेले. त्यात त्याचा मृत्यू झाला. तर दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. अपघात घडल्यानंतर पिक अप मालक घटनास्थळी न थांबता तेथून निघून गेला. त्यांच्या विरोधात मृत्यूस कारणीभूत असल्याची तक्रार देण्यात आली आहे.

## गॅस सिलिंडरच्या किमतीत घट दिल्लीपासून मुंबईपर्यंत नवीन दर लागू

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

लोकसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याआधीच एलपीजी सिलिंडरच्या बाबतीत एक महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर आलेली आहे. या बातमीमुळे हॉटेल मालकांना दिलासा मिळालेला आहे. कारण व्यावसायिक सिलिंडरच्या 19 ते 20 रुपयांपर्यंतची कपात करण्यात आलेली आहे. आज शनिवार म्हणजेच 01 जूनपासून देशभरात एलपीजी सिलिंडरच्या दरामध्ये घट करण्यात आलेले आहे. यामुळे दिल्लीपासून ते मुंबईपर्यंत आता एलपीजी सिलिंडरचे आजपासून नवे दर लागू झालेले आहेत. IOCL म्हणजेच इंडियन ऑयलच्या वेबसाईटनुसार 19 किलोग्रामच्या एलपीजी सिलिंडरच्या दरांमध्ये कपात करण्यात आलेली आहे. ज्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या निकालाआधीच एक चांगली बातमी सर्वांनाच मिळालेली आहे.

इंडियन ऑइलच्या वेबसाइटने जाहीर केल्यानुसार, आज शनिवार, 01 जूनपासून राजधानी दिल्लीत 19 किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरची किंमत 19 रुपयांनी कमी झाली आहे. या सिलिंडरची आधीची किंमत 1764.50 रुपये होती. आता ती 1745.50 रुपयांपर्यंत कमी झाली आहे. तर मुंबईतील व्यावसायिक सिलिंडरची किंमत 1717.50 रुपयांवरून 1698.50 रुपयांवर आली आहे. तर चेन्नईमध्ये हा सिलिंडर 1930 रुपयांऐवजी 1911 रुपयांना मिळेल. कोलकात्यात हा सिलिंडर 20 रुपयांनी स्वस्त झाला असून तो आता 1879 रुपयांऐवजी 1859 रुपयांना मिळणार आहे.

तसेच, मुंबईत घरगुती सिलिंडरती किंमत 902 रुपयांवरून 802.50 रुपये करण्यात आली आहे. म्हणजेच घरगुती सिलिंडरच्या दरात 100 रुपयांनी कपात करण्यात आली आहे. तर, देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत घरगुती सिलिंडरती किंमत 803 रुपये आहे, तर उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना तो 603 रुपयांना मिळेल. या सिलिंडरची किंमत कोलकात्यात 829 रुपये आणि चेन्नईमध्ये 818.50 रुपये आहे. याआधी महिला दिनानिमित्त केंद्र सरकारने 14 किलोच्या घरगुती गॅस सिलेंडरच्या किमतीत 100 रुपयांपर्यंत कपात करण्याचा निर्णय घेतला होता.




■ दोन महिन्यांमध्ये सिलिंडरच्या दरात दुसऱ्यांदा कपात करण्यात आली आहे. हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये वापरल्या जाणाऱ्या व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात कपात झाली असली तरी घरगुती स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या 14.2 किलो सिलिंडरच्या दरात कोणताही बदल झालेला नाही.

■ म्हणजेच सर्वसामान्य जनतेला याचा फायदा होणार नाही. त्यामुळे सर्वसामन्य नागरिक नाराज होण्याची शक्यता आहे. याआधी सरकारने इंधनाच्या किमती कमी करण्याबाबत कोणताही निर्णय न घेतल्यामुळेही जनता नाराज आहे.